नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट,नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष ५२ * अंक ५९ * | * अकोला * | रविवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## मनोज जरांगे आणि शिष्टमंडळ यांच्यातील
# चर्चा फिस्कटली !

जरांगेंच्या आंदोलनाचा दुसरा दिवस
सरकारला अल्टीमेटम
संपूर्ण मुंबईची कोंडी
आंदोलकांचे बेहाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. आज त्यांच्या आंदोलनाचा दुसरा दिवस होता. या प्रकरणी तोडगा काढण्यासाठी सरकारवरील दबाव वाढला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी यासंबंधी सखोल आढावा घेतल्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर लवकरच ठोस तोडगा निघण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात ओबीसी समाजाला रस्त्यावर उतरवण्याचा इशारा दिल्यामुळे हा तिढा अधिकच बिकट होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, सरकारच्यावतिने पाठविण्यात आलेल्या शिंदे समितीसोबत जरांगे यांची झालेली चर्चा फिस्कटली असून, सरकारला आता वेळ देणार नसल्याचे जरांगे यांनी ठासून सांगितले आहे . शिंदे समितीने बॉम्बे गव्हर्नमेंट व औंध संस्थानच्या गॅझेटियरसाठी वेळ मागितला. या दोन मुद्यांवर वेळ देण्यासाठी आमची तयारी आहे. पण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या मुद्यावर एक मिनिटही वेळ मिळणार नाही, असे जरांगे म्हणाले.

शिंदे समितीला इकडे चर्चेसाठी पाठवणे हा मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या राज्य सरकारचा, राज्याच्या राजभवनाचा व दोन्ही कायदेमंडळाचा केलेला अपमान आहे. हे काम शिंदे समितीचे नाही. मुख्यमंत्र्यांकडून राज्यपाल भवनाचा अपमान होत आहे. सरकारने राज्य मंत्रिमंडळाला चर्चा करण्यासाठी पाठवण्याची गरज होती. पण त्यांनी शिंदे समितीला पाठवले. हे साफ चूक आहे. इथे विधान मंडळ अस्तित्वात आहे. इथे राज्यपाल अस्तित्वात आहेत. त्यानंतरही त्यांनी शिंदे समितीला पाठवून राज्याचा अपमान केला. स्वतः देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राच्या कायदेमंडळाचा अपमान करण्याचे काम करत आहेत. कदाचित त्यांचे तोंड काळे झाले असेल म्हणून त्यांनी ही समिती पाठवली असेल, असे जरांगे म्हणाले.



**एक तासाचाही वेळ वाढवून मिळणार नाही**

शिंदे समिती आमच्याकडे वेळ मागत होती. पण आम्ही त्यांना एक तासाचाही वेळ दिला नाही. सगेसोयरेच्या मुद्यावर आमची त्यांच्याशी चर्चाच झाली नाही. मराठा व कुणबी एकच आहे. हा ५८ लाख नोंदींचा अहवाल आहे.

**मी मराठा कुणबी घोषित केल्याशिवाय येथून उठणार नाही**

मनोज जरांगे यांनी सरकारच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना आपण मराठा - कुणबी घोषित केल्याशिवाय जागा सोडणार नसल्याचे ठणकावून सांगितले. सरकारने हैदराबाद व सातारा गॅझेटनुसार नोंदी घ्याव्यात. मराठवाड्यातील मराठा समाजाला सरसकट कुणबी घोषित करावे. उद्या सकाळपासूनच सर्वांना कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यास सुरुवात करा. मराठवाड्यातील सगळा मराठा समाज हा कुणबी आहे यावर आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, असे जरांगे म्हणाले. त्यावर शिष्टमंडळाने असे करता येणार नाही असे म्हणाले. त्यानंतर जरांगे यांनी आपण मराठा कुणबी घोषित केल्याशिवाय आझाद मैदान सोडणार नाही, एक दिवसांची परवानगी देण्याचे हे असले भंगार खेळ खेळण्यापेक्षा सरकारने मराठ्यांना आरक्षण देऊन टाकावे, सर्व समस्या सुटतील, त्यांनी असे स्पष्ट सांगितले.



### मराठा आंदोलकांचा गोंधळ

दक्षिण मुंबईत सध्या खाऊ गल्ली बंद असल्यामुळे मंत्रालयाजवळ असलेल्या आकाशवाणी आमदार निवासच्या कँटीनमध्ये आंदोलकांनी जेवण्यासाठी गर्दी केली आहे. अचानक वाढलेल्या या गर्दीमुळे काही काळासाठी आकाशवाणी आमदार निवासाची कँटीन बंद करण्यात आली. यामुळे आंदोलकानी मोठा गोंधळ केला. आंदोलकांच्या गोंधळानंतर टप्प्याटप्प्याने कँटीनमध्ये जेवायला सुरुवात केली आहे.

### मराठे वेदना घेऊन आलेत

आंदोलकांबाबत गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न सुरु आहे. मराठ्यांची मुलं काही म्हणणार नाहीत, ते माज घेऊन नव्हे तर वेदना घेऊन मुंबईत आले आहेत. मी मराठ्यांसाठी बलिदान देण्यासाठी तयार आहे. आता मी मरेल किंवा आरक्षण मिळवेल. मी एकतर उपोषण करुन मरेल किंवा सरकार मला गोळ्या घालून मारेल, पण मी आता मागे हटणार नाही, अशा शब्दात जरांगेंनी ठणकावून सांगितले.

### आरक्षणासाठी घटनादुरुस्ती गरजेची : शरद पवार



मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महत्त्वपूर्ण भूमिका मांडली आहे. जर तामिळनाडूमध्ये ७२ टक्के आरक्षण देता येऊ शकते, तर घटनेत बदल करून महाराष्ट्रातील मराठा समाजालाही न्याय देता येऊ शकतो. आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा असेल, तर घटनादुरुस्ती आवश्यक आहे, असे विधान त्यांनी अहमदनगर येथील कार्यक्रमात केले. शरद पवार यांनी स्पष्ट केले की, समाजाच्या प्रगतीसाठी आरक्षण हा एक महत्त्वाचा मार्ग आहे. केंद्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन वेळप्रसंगी संसदेत घटनादुरुस्ती करणे आवश्यक आहे,असेही ते म्हणाले.
सुप्रीम कोर्टाने ५०- ५२% आरक्षण मर्यादा घालून दिली असली तरी तामिळनाडूसारख्या राज्यात ७२% आरक्षण सुप्रीम कोर्टात टिकले असल्याचे उदाहरण देत पवार यांनी मराठा आरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आवाहन केले.

## कंटेनरने चिरडले
# ६ भाविक ठार

मंदिरात दर्शनाला जाताना काळाचा घाला

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ३० :**
भरधाव ट्रकने दिलेल्या धडकेत ६ भाविकांचा जागीच मृत्यू झाल्याची भयंकर घटना शनिवारी सकाळी बीड शहरालगतच्या सोलापूर - धुळे महामार्गावरील नामलगाव फाटा येथे घडली आहे. हे सर्व भाविक पेंडगाव येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी पायी जात होते. तेव्हाच काळाने झडप घातली.

माहितीनुसार, बीड शहर व तालुक्यातील शिदोड गावचे काही भाविक शनिवारी सकाळी ७.३० च्या सुमारास पेंडगाव येथील हनुमान मंदिरात दर्शनासाठी पायी जात होते. तेव्हा भरधाव वेगातील एका कंटेनरने त्यांना चिरडले. हा अपघात एवढा भयंकर होता की, ४ भाविकांचा जागीच मृत्यू झाला. तर इतर दोघांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलीस व गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना रुग्णालयात हलवले. या घटनेत इतर काही भाविक जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांच्यावर बीड जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विशाल श्रीकिसन काकडे (रा. शेकटे, ता. शेवगाव, जि. अहमदनगर), अमोल नामदेव गरजे (रा. बोधेगाव, ता. शेवगाव), आकाश कोळसे, पवन जगताप, किशोर तोर (रा. बाबुलतरा, ता. गेवराई) अशी या अपघातात ठार झालेल्या मृतांची नावे आहेत. इतर दोघांची नावे समजू शकली नाहीत.

पोलिसांनी कंटेनर चालकाला अटक केली आहे. या घनटेमुळे परिसरात एकच खळबळ माजली असून, मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी गढी उड्डाणपुलाजवळही असाच एक अपघात झाला होता. त्यात कंटेनरच्या धडकेतच ५-६ जणांचा मृत्यू झाला होता.

## भारत कोणत्याही किंमतीत तडजोड करणार नाही

टॅरिफ वादावर राजनाथ यांचे रोखठोक उत्तर



■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ३० :**
अमेरिकेच्या शुल्कावरील वादाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, कोणताही देश कायमचा मित्र किंवा शत्रू नसतो. फक्त कायमचे हित असते. शनिवारी एनडीटीव्ही संरक्षण शिखर परिषदेत राजनाथ सिंह यांनी हे विधान केले.
ते म्हणाले की जगात व्यापार युद्धासारखी परिस्थिती आहे. विकसित देश अधिकाधिक संरक्षणवादी होत आहेत. भारत कोणालाही आपला शत्रू मानत नाही, परंतु आम्ही राष्ट्रीय हित आणि लोकांच्या हिताशी तडजोड करणार नाही. ट्रम्पच्या टॅरिफ विरोधात भारत, रशिया आणि चीन जवळ येत असल्याने राजनाथ यांचे विधान जोडले जात आहे.
सिंह म्हणाले, भारताच्या संरक्षण क्षमतेचे जग साक्षीदार आहे. आपल्या सैन्याने ज्या पद्धतीने स्वदेशी उपकरणांनी पाकिस्तानवर अचूक हल्ले केले त्यावरून हे दिसून येते की दूरदृष्टी आणि तयारीशिवाय कोणतेही अभियान यशस्वी होऊ शकत नाही. २०१४ मध्ये, आपली संरक्षण निर्यात ७०० कोटी रुपयांपेक्षा कमी होती. आज ती सुमारे २४ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे, जी विक्रमी पातळी गाठली आहे. यावरून असे दिसून येते की भारत आता खरेदीदार राहिला नाही तर निर्यातदार बनत आहे.

दुसरीकडे,हवाई दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी यांनी ऑपरेशन सिंदूरचे नवीन व्हिडिओ आणि तपशील शेअर केले. ते म्हणाले की, पाकिस्तानला युद्धबंदीच्या टेबलावर आणण्यासाठी भारतीय हवाई दलाने ५० पेक्षा कमी शस्त्रे गोळीबार केला.

## अमित शहांनी घेतला आंदोलनाचा आढावा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**
मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे अवघ्या राज्याचे रान पेटले आहे. त्यातच मुंबईच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शनिवारी भाजप सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडून या आंदोलनाचा सविस्तर आढावा घेतला.



यावेळी त्यांनी हे आंदोलन हाताळण्यासंदर्भात काही सूचना केल्याचीही माहिती आहे. शहांनी सह्याद्री अतिथीगृहावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशीही या प्रकरणी चर्चा केली. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आता सरकारच्या पातळीवर वेगवान हालचाली होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमित शहा शुक्रवारी रात्री मुंबईला पोहोचले. त्यांनी आज लालबागच्या राजाचे सहकुटुंब दर्शन घेतले. तत्पूर्वी, त्यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत धडकलेल्या मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा आढावा घेतला. यासाठी त्यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना त्यांनी सह्याद्री अतिथीगृहावर पाचारण केले. यावेळी दोन्ही नेत्यांत बराच वेळ चर्चा झाली. त्यानंतर या ठिकाणी सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे हे ही पोहोचले. शहा यांनी यावेळी शिंदे यांच्याशी जवळपास तासभर चर्चा केल्याची माहिती आहे.
यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते. या बैठकीत नेमके काय ठरले हे समोर आले नाही. बैठकीनंतर अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या सरकारी बंगल्यावर जाऊन त्यांच्या गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नीही होत्या.

## दोन समाज झुंजवणे योग्य नाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**
दोन समाजात तेढ निर्माण करणे आमच्या तत्त्वात बसत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. एका समाजाला संतुष्ट करण्यासाठी दुसऱ्या समाजाला असंतुष्ट करणे सरकारला मान्य नसल्याचेही ते म्हणालेत.



सगळ्याचे समाधान काढण्यावर आमचा प्रयत्न आहे, राज्यात युती आणि महायुतीच्या सरकारनेच मराठा समाजासाठी चांगले निर्णय घेतल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानात उपोषणाला बसले आहेत. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने मराठा बांधव जमले आहेत. दुसरीकडे, सरकारने या प्रश्नावर चर्चेसाठी पुढाकार घेतला आहे.

मराठा आरक्षणाच्या आंदोलनासंदर्भात सरकारची भूमिका पहिल्या दिवशीपासून स्पष्ट असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. कोणत्या राज्याला वाटत असेल की, आपल्या राज्यातील मोठा घटक असंतुष्ट राहावा, त्याच काय फायदा आहे. पण, एकाच्या संतुष्टीकरता दुसऱ्याला त्याच्यासमोर भांडणासाठी उभे करा, दुसऱ्याला असंतुष्ट करा हे आम्हाला मान्य नाही. राजकारण चुलीत गेले पण अशाप्रकारे समजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणे हे आमच्या तत्त्वात कुठेही बसत नाही. म्हणून, सगळ्याचे समाधान कसे निघेल असा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## वंशावळ समितीस मुदतवाढ

मराठा समाजासाठी दिलासा : शिरसाट यांची माहिती

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ३० :**
मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील अवघी मुंबई वेठीस धरली असताना राज्य सरकारने मराठा समाजाला मोठा दिलासा देत मराठा आरक्षणासंबंधी तालुकास्तरीय वंशावळ समितीस 30 जून 2030 पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयाचा मराठा समाजातील लाखो नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी शुक्रवारपासून मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू केले आहे. सरकारने शक्य त्या मार्गाने मराठा समाजाला दिलासा देण्याचे काम सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने वंशावळ समितीस मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

माहितीनुसार, राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि. 30 जून 2026 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये ही समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी 30 जून 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, मा. न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ 31 डिसेंबर 2025 पर्यंत वाढविण्यात आला होता.

यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ 30 जून 2026 पर्यंत वाढविण्यात आला आहे. सदर समितीस 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील.

## रियासीमध्ये भूस्खलन
## ७ मृतदेह काढले

■ **वृत्तसंस्था,जम्मू, दि. ३० :**
शनिवारी सकाळी जम्मू-काश्मीरमधील रियासी जिल्ह्यातील बदर गावात भूस्खलन झाले. आतापर्यंत ढिगाऱ्यातून ७ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. इतर लोकांचा शोध सुरू आहे. त्याच वेळी, रामबनच्या राजगडमध्ये ढगफुटीमुळे ३ जणांचा मृत्यू झाला. २ जण बेपत्ता आहेत. येथे बचाव-शोध मोहीम राबविण्यात येत आहे.

शुक्रवारी रात्री उशिरा हिमाचल प्रदेशातील मंडी येथील गोहर येथे ढगफुटी झाली. नंदी पंचायतीतील नसेनी नाल्यात अनेक वाहने वाहून गेली. शिमला येथील जुतोग कॅन्टमध्ये भूस्खलन झाले. लष्कराच्या निवासी इमारती रिकामी करण्यात आल्या.

अमृतसर, पठाणकोटसह पंजाबमधील ८ जिल्ह्यांमध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. २५० हून अधिक गावे ५ ते १५ फूट पाण्याने भरली आहेत. आतापर्यंत ८ जणांचा पुरात मृत्यू झाला आहे. ३ जण बेपत्ता आहेत.
शुक्रवारी उत्तराखंडमधील चमोली, रुद्रप्रयाग, टिहरी आणि बागेश्वर येथे ढगफुटी झाली. या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाला.



# जनतेला देण्यात येणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिशील आणि तंत्रज्ञानयुक्त असाव्यात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

शासनाकडून जनतेला देण्यात येणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिशील आणि तंत्रज्ञानयुक्त असाव्यात. शासनाची संस्थात्मक बांधणी करताना नाविन्यपूर्ण आणि सातत्याने केलेल्या बदलांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाने सज्ज असले पाहिजे. प्रशासनाने लोकाभिमुख सेवा वाढविल्या तरच शासनाचे उत्तरदायित्व वाढेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे 150 दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेत सहभागी विभाग आणि कार्यालये यांच्या अंतरिम प्रगतीचा आढावा बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री म्हणाले की, ई-गव्हर्नन्सचे दीडशे दिवसांचे विविध विभागांचे सादरीकरण झाले ते चांगेल आहे. शासनाची संस्थात्मक बांधणी करण्यासाठी शासनाचे सर्व विभाग ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेत नाविन्यपूर्ण काम करत आहेत, ही चांगली बाब आहे. शासनात अनेक चांगले अधिकारी येतात आणि ते नाविन्यपूर्ण संकल्पना मांडतात पण ती संकल्पना कायमस्वरूपी टिकवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. प्रशासनात गुणवत्तापूर्ण बदल करताना शासन आणि जनता यांच्यामध्ये समन्वय साधणारी यंत्रणा तयार होणे गरजेचे आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याच्या विकासाला हातभार लावण्यासाठी प्रशासनाने ए.आय. चा वापर करून अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त विविध सेवा देण्याचा प्रयत्न करावा. यामुळे प्रशासनावरील कामाचा ताण कमी होण्यास

## ई-गव्हर्नन्स सुधारणा मोहिमेचा मुख्यमंत्र्यांनी घेतला आढावा

मदत होईल. महाराष्ट्र तंत्रज्ञान वापरत असून हा अग्रक्रम कायम राखण्यासाठी व देशात प्रथम क्रमांकावर राहण्यासाठी नाविन्यपूर्ण व सातत्याने केलेल्या बदलांची प्रभावी अंमलबजावणी करावी. 150 दिवसांच्या कार्यक्रमात अधिकाधिक काम पूर्ण करुन प्रशासनामध्ये बदल करण्यासाठी सामान्य प्रशासनाबरोबरच प्रशिक्षित मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. आपल्या सर्वांना खूप काम एका वेळेला पद्धतशीरपणे करणे अत्यंत आवश्यक आहे.

वन विभागाने 33 टक्के वनआच्छादन निर्मिती करण्याचा आगामी चार वर्षांचा आराखडा या तीन महिन्यात सादर करावा.जिथे वनक्षेत्र कमी आहे अशी ठिकाणे त्याचबरोबर मराठवाड्यात वनक्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत अशाही सूचना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केल्या. यावेळी कोकण परिक्षेत्राच्या विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'समुद्र संदेश' ॲप चे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. अमानवी आणि एन्ट्री पॉईंटच्या ठिकाणी सीसीटीव्ही बसवावेत अशा सूचना मुख्यमंत्री यांनी केल्या.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी ई-गव्हर्नन्स अंतर्गत देण्यात आलेल्या 150 दिवसांच्या कार्यक्रमामध्ये 100 टक्के कार्यालयांनी भाग घेतला असून सर्वांनीच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्कृष्ट काम केल्याबद्दल कौतुक केले. प्रत्येक विभागाने आपला स्वतंत्र डॅशबोर्ड तयार न करता राज्याचा एकच डॅशबोर्ड असेल, सर्वांनी त्यावरच आपल्या कामाची लिंक द्यावी, अशी सूचना त्यांनी केली. त्याचप्रमाणे चॅटबॉट, डिजीलॉकर, गतीशक्ती पोर्टल आदींच्या बाबतीत देखील एकसूत्रता असावी, आपले सरकार पोर्टलमध्ये अपिलची सुविधा असावी, सर्व प्रकारची प्रमाणपत्रे ऑनलाईन मिळण्याची सोय करावी, अशा सूचना केल्या.

# तरुणीची सोनसाखळी हडपून केला लैंगिक अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

तरूणीशी इन्ट्राग्रामवर ओळख निर्माण करून तिला लॉजवर नेऊन तिच्या गळ्यातील अडीच तोळ्याची सोनसाखळी पहाण्यास घेऊन ती परत देण्यासाठी तिला शरीर संबंधात भाग पाडणाऱ्या व नंतर तिचा गर्भपात घडवून आणणाऱ्या एकावर फरासखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सौरभ विलास धोत्रे (२५, रा. वडत्तरवाडी, दिपबंगला चौक) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत एका २१ वर्षीय तरूणीने पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. हा प्रकार मे २०२४ ते फेब्रुवारी २०२५ दरम्यान घडला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मे २०२४ मध्ये फिर्यादी आणि तरूणीची इन्स्ट्राग्रामवर ओळख झाली. त्यातून त्याने तरूणीला भेटण्यास बोलवून तिला एका लॉजवर नेले. तेथे तिला तिच्या गळ्यातील अडीच तोळ्याची सोनसाखळी पहाण्यास मागीतली. त्यानंतर ती सोनसाखळी परत करण्यासाठी त्याने तिच्या इच्छेविरोधात तिच्यावर लैंगिक अत्यार केले. यानंतर तरूणी गर्भवती राहिल्यानंतर तिला गर्भपात करण्यास भाग पाडले. आरोपीने तिची सोनसाखळी परत न केल्याने त्याने तिच्यासोबत बोलणे बंद केल्याणे व भेटणे बंद केल्याने त्याने तरूणीचा बनावट इन्ट्राग्राम आयडी तयार केला. त्यावरती तरूणीचे व आरोपी सोबतचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. तसेच आरोपीने तरूणीच्या वडीलांच्या दुकानावर जाऊन ७० हजार रूपयांची मागणी केली. पैसे न दिल्यास आरोपीने त्याचे आणि तरूणीचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली.

# लालबागचा राजाला १ कोटींवर दान



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मुंबईचा राजा अशी ओळख असलेल्या लालबागचा राजाच्या चरणी गणेशोत्सवाच्या पहिल्या दोन दिवसांतच भाविकांनी भरभरून दान केले आहे. मंडळाकडून मिळालेल्या माहितीनुसार, बाप्पाच्या दानपेटीत अवघ्या दोन दिवसांत १ कोटी १९ लाखांहून अधिक रोख रक्कम जमा झाली आहे. यासोबतच सोन्या-चांदीचे दागिनेही मोठ्या प्रमाणात अर्पण करण्यात आले आहेत.

शुक्रवारी एकाच दिवसात ७३.१० लाख रुपयांचे विक्रमी दान जमा झाले. यामध्ये स्टेजसमोरील दानपेटीत ३८.१० लाख रुपये, तर दर्शनाच्या रांगेतील दानपेटीत ३५ लाख रुपये मिळाले. रोख रकमेव्यतिरिक्त भाविकांनी २२५.८०० ग्रॅम सोने आणि ७,६५९ ग्रॅम चांदीचे दागिनेही दान केले. यापूर्वी गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी मंडळाला ४६ लाख रुपयांचे दान मिळाले होते.

त्यात स्टेजसमोरील पेटीतून २५.५० लाख रुपये आणि रांगेतील पेटीतून २०.५० लाख रुपये जमा झाले होते. पहिल्या दिवशीही १४४.०५० ग्रॅम सोने आणि ७,१५९ ग्रॅम चांदीचे दागिने अर्पण करण्यात आले होते. या दोन दिवसांतील एकूण दानाची बेरीज पाहता बाप्पाच्या चरणी १ कोटी १९ लाख रुपयांची रोख रक्कम, सुमारे ३६९.८५० ग्रॅम सोने आणि १४,८१८ ग्रॅम चांदी जमा झाली.

# पुण्यात नोव्हेंबरमध्ये खासदार क्रीडा महोत्सव

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फिट युवा फॉर विकसित भारत अशी साद घालत 'खासदार क्रीडा महोत्सव' उपक्रमाची संकल्पना मांडली आहे. मोदीजींची 'फिट इंडिया'ची संकल्पना साकार होण्यासाठी पुण्यात पहिला 'खासदार क्रीडा महोत्सव' येत्या नोव्हेंबरमध्ये आयोजित केला जाणार आहे. त्यामुळे दीपोत्सवानंतर पुणेकरांना खेलोत्सव अनुभवता येणार आहे, अशी महिती केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक मंत्री, पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने डेक्कन जिमखाना येथे झालेल्या पत्रकार परिषदेवेळी खासदार क्रीडा महोत्सवाचे प्रमुख समन्वयक व छत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे, ऑलिंपिक खेळाडू व अर्जुन पुरस्कार विजेते मनोज पिंगळे, भारतीय हॉकी संघाच्या माजी कर्णधार व अर्जुन पुरस्कार विजेता रेखा भिडे, अर्जुन पुरस्कार विजेते कबड्डीपटू शांताराम जाधव, अर्जुन पुरस्कार विजेते विलास कथुरे, माजी क्रिकेटपटू केदार जाधव, कुस्तीगीर संघाचे संदीप भोंडवे, हिंदकेसरी योगेश दोडके आदी उपस्थित होते. संयोजन समितीमध्ये नेमबाज व खेलरत्न पुरस्कार विजेत्या अंजली भागवत, अर्जुन पुरस्कार विजेत्या कबड्डीपटू सुरेखा द्रविड, बुद्धिबळ ग्रॅंडमास्टर अभिजित कुंटे यांच्यासह पुण्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, देशात क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी 'फिट इंडिया' अंतर्गत खासदार क्रीडा महोत्सवाचे आयोजन होत आहे. या महोत्सवात खेळाडूंसोबतच ज्येष्ठ नागरीक, दिव्यांग अशा सर्वांना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे. भारतीय खेळांसह आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळल्या जाणाऱ्या सर्व खेळांच्या स्पर्धा होतील. ३३ प्रकारच्या क्रीडा स्पर्धांमध्ये हजारो खेळाडू सहभागी होणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी बुद्धीबळ व कॅरम, दिव्यांगांसाठी बास्केटबॉल व पोहण्याची स्पर्धा घेण्यात येणार आहे.खासदार क्रीडा महोत्सव हा देशातील प्रतिभावान युवा खेळाडूंचा शोध घेणारा महोत्सव आहे.

# आवाजाच्या भिंतींविरोधात डॉक्टर, वकील, विद्यार्थ्यांचा मूक मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
धुळे, दि. ३० :

सण, उत्सवात आवाजाच्या भिंतींमुळे (डीजे) आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, लेसर प्रकाशामुळे होणारा दृष्टीदोष, याकडे लक्ष वेधण्यासाठी येथे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी सकाळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकापासून मूक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात डॉक्टर, वकील, ज्येष्ठ नागरिक, खेळाडू, शालेय विद्यार्थी आणि व्यावसायिक यांची एकजूट दिसून आली. सर्वांनी आवाजाच्या भिंती, लेसर प्रकाशाचा वापर बंद करण्याची मागणी केली.

धुळ्यातील श्रीराम पेट्रोल पंपाजवळील छत्रपती शिवाजी स्मारकापासून मोर्चला सुरुवात झाली. मोर्चात आयएमएचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष रवी वानखेडकर, आयएमए धुळेचे अध्यक्ष मनिष जाखेटे, उपाध्यक्ष महेंद्र राजपूत, सचिव योगेश ठाकरे, खजिनदार राहुल बच्छाव, चारुहास जगताप, नारायण




गलाणी, संजय शिंदे, रवींद्र पाटकरी, विवेक जाधव, स्वप्निल पाटील, अभिनय दरवडे या डॉक्टरांसह धुळे व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नितीन बंग, सेंट अँथनी स्कुलचे फादर विल्सन रॉड्रीक्स यांच्यासह शहरातील अनेक संस्था, संघटनांचे पदाधिकारी तसेच विविधि शाळांमधील विद्यार्थी, नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी-विद्यार्थीनी, वकील संघटना आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करणाऱ्या आवाजाच्या भिंतींना कायमस्वरुपी हद्दपार केले पाहिजे. कानात सतत काहीतरी गुणगुणत असल्याची आणि सतत काहीतरी वाजल्याची जाणीव होणे, एकाग्रतेत अडथळा येणे,वृध्दांमध्ये डोकेदुखीची समस्या उद्भवणे असे शारीरिक विकार होतात.

# ओला-उबर-रॅपिडोवर घणाघात; परवाना नसेल तर खेळ खल्लास!

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

महाराष्ट्र शासनाने ई-बाईक टॅक्सी धोरण ठरवण्याची प्रक्रिया सुरू असतानाही परवाना न घेता सेवा सुरू ठेवणाऱ्या ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या कंपन्यांवर सरकारने आक्रमक पवित्रा घेतला आहे. शासनाच्या आदेशाला न जुमानणाऱ्या कंपन्यांवर सातत्याने दंडात्मक कारवाई सुरूच राहील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला. मुंबई परिसरात बाईक टॅक्सी ॲग्रिगेटर कंपन्यांविरोधात नागरिकांच्या अनेक तक्रारी आल्यानंतर कालच मोटार परिवहन विभागाने मोठी कारवाई केली. ५७ वाहनांवर दंडात्मक कारवाई करून १.५ लाख रुपये दंड वसूल करण्यात आला. शासनाचे आदेश वारंवार मोडणाऱ्या कंपन्यांचे परवाने कायमचे रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले.

# माविमच्या माध्यमातून ४० मेट्रिक टन हिरवी मिरची दुबईला निर्यात

■ महासागर प्रतिनिधी. मुंबई, दि. ३० :

ग्रामीण महिलांना औद्योगिक आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पा अंतर्गत विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले असून यामुळे इतर महिलांनाही प्रोत्साहन मिळत आहे.

ग्रामीण महिलांनी कृषी क्षेत्रात नेतृत्व करत आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) यांच्या मार्गदर्शनाखाली बारामतीतील ३० महिला शेतकऱ्यांनी उच्च दर्जाची हिरवी मिरची पिकवून तब्बल ४० मेट्रिक टन उत्पादन दुबईला निर्यात केले. हा उपक्रम नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात आला. या उपक्रमाची अंमलबजावणी संघर्ष क्लस्टर मायक्रो रिसोर्स सेंटर, बारामती यांच्या माध्यमातून झाली असून कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले. तसेच खरेदी व बाजारपेठेसाठी आदी नेचर फूड्स प्रा. लि. यांच्याशी खरेदी हमी करार करण्यात आला.

२२ एकर क्षेत्रावर प्रायोगिक तत्वावर सुरू झालेल्या या शेतीत ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर, सेंद्रिय खतांचा वापर व एकात्मिक कीड व्यवस्थापनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करण्यात आला. नेदरलँड तंत्रज्ञानावर आधारित उगमशिव मिरचीची रोपेही वापरण्यात आली.

एकूण उत्पादनात प्रति महिला सरासरी ६,००० किलो मिरची मिळाली. त्यात स्मिता पवार (७,६९२.५ किलो), रोहिणी जाधव (७,६६७.५ किलो) आणि राणी जामधडे (६,०५२.५ किलो) यांचे विशेष योगदान राहिले. अनियमित पाऊस, काढणी नंतरची गुणवत्ता व नियार्तीतील आव्हाने यावर मात करण्यासाठी सतत फील्ड मार्गदर्शन, पीक विमा सल्ला व प्रक्रिया प्रशिक्षण दिले गेले. पुढील टप्प्यात उत्पादनाच्या गुणवत्तेसाठी स्थळावर ग्रेडिंग युनिट उभारण्याची योजना आहे.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक उत्पन्न वाढले असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचा अनुभव, तांत्रिक ज्ञान आणि उद्योजकीय कौशल्य विकसित झाले आहे.

# मराठा आरक्षणासाठी संविधानात बदल करू शकत नाही का : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३० :

मराठा आरक्षणाच्या मागणीने पुन्हा एकदा राज्यातील राजकारण ढवळून निघाले असताना, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर थेट हल्ला चढवला आहे. मराठा आरक्षणासाठी संविधानात बदल करू शकत नाही का? केंद्रात तुमचंच सरकार असताना कायदे का नाही करत? असा थेट सवाल राऊतांनी केला आहे. तर आंदोलक पावसात भिजत असताना सरकार मात्र बघ्याची भूमिका घेत आहे,संविधानाच्या चौकटीत बसणारे निर्णय घेण्याचे सत्ताधाऱ्यांचे विधान जर खरे असेल, तर मग विरोधकांना दाबण्यासाठी संविधान बदलता येतो आणि मराठा



समाजाला आरक्षण देताना का नाही? का असा सवालही त्यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख विरोधी पक्षाच्या नेत्यांशी चर्चा केली पाहिजे. त्यांनी अहंकार बाजूला ठेवत प्रमुख विरोधी पक्षासह सर्व माजी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली पाहिजे. त्यांच्यासह मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली पाहिजे. आरक्षणावर सामूहिक निर्णय घेतला पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, सरकारमध्ये 3 गट आहे. एकनाथ शिंदे आंदोलकांना वेगळ्या पद्धतीने देवेंद्र फडणवीस अडचणीत यावे यासाठी मदत करत आहे. देवेंद्र फडणवीस यांची भूमिका वेगळी आहे. ते परशुराम महामंडळ वाले आहेत. तर अजित पवार हे चीनच्या भिंतीसारखे तटस्थ आहे. आंदोलनावर त्यांची भूमिका नाही, अशा परिस्थितीमध्ये राजकीय इच्छाशक्ती येणार कुठून असा सवाल राऊतांनी केला आहे. यामुळे संविधानाची चौकट बदलणार कशी? या सगळ्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांचे प्राण पणास लागले आहे. आणि त्यांचे हजारो समर्थक आहेत ते रस्त्यावर पावसात भिजत बसले .

# दगडूशेठ गणपतीचे रुग्णालयात व्हर्च्युअल दर्शन

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ३० :

भक्ती आणि सेवेची उदात्त परंपरा कायम राखत, यंदा सलग १० व्या वर्षी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे 'इमर्सिव्ह दर्शन' हे ज्यांना प्रत्यक्ष उत्सवात येणे शक्य नाही अशांसाठी ट्रस्टने उपलब्ध करून दिले आहे. व्हर्च्युअल रिॲलिटी द्वारे यंदाच्या सजावटीमध्ये प्रत्यक्ष आपण उभे आहोत तसेच थेट गुरुजींच्या शेजारी उभे राहून आरतीत सहभागी झाल्याचा अनुभव रुग्णांनी घेतला. रुग्णालयात असूनही बाप्पाचे दर्शन घेता आल्याने अनेकांचे डोळे पाणावले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने यंदाच्या गणेशोत्सवात अजय पारगे आणि संजय पारगे बंधू यांनी पुढाकार घेत हा अभिनव उपक्रम राबविला. मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालय आणि कसबा पेठेतील सूर्या सह्याद्री रुग्णालयातील



रुग्णांनी यानिमित्ताने दर्शनाचा आनंद घेतला. आजारपणामुळे रुग्णालयातील खाटेवरुन कुठेही जाता न येणा-या रुग्णांना गणेशोत्सवात लाडक्या गणरायाचे दर्शन घेण्याची मनोमन इच्छा असते. मात्र, इच्छा असूनही त्यांना विविध आजारांशी झुंज देत रुग्णालयात राहून केवळ मनामध्ये गणरायाचे रूप साठवावे लागते. अशा रुग्णांना 'व्हर्च्युअल रिॲलिटी' द्वारे आपण प्रत्यक्षपणे उत्सवमंडपात आहोत.

# मराठा आरक्षण : उत्तर कोण देणार?

मुंबईतील आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस सुरू आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ते ठाम आहेत. पण, या आंदोलनामागचा मोठा प्रश्न असा की उत्तर देणार कोण?

मनोज जरांगे पुन्हा का आले, हा सवाल आता राजकारणाच्या केंद्रस्थानी पोहोचला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावर सूचक प्रतिक्रिया देत स्पष्ट सांगितले की, मराठा आरक्षणाच्या प्रश्नाची उत्तरे फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेच देऊ शकतात. मागच्यावेळी त्यांनी नवी मुंबईत जाऊन प्रश्न सोडवला, मग जरांगे पुन्हा मुंबईत का आले, हे त्यांनाच सांगावं लागेल.

राज ठाकरेंचं हे वक्तव्य नुसतं सूचक नाही तर सत्तेच्या गाभाऱ्यातील गोंधळ उघड करतं. कारण आरक्षणाच्या मुद्यावर सरकारमधील तिन्ही गटांची भूमिका वेगळी आहे.



दीपक कैतके

खासदार संजय राऊत यांनीही आज बोट ठेवले, महायुतीत तीन वेगवेगळ्या भूमिका आहेत. शिंदे आंदोलकांना मदत करत आहेत, फडणवीस परशुराम महामंडळाच्या पातळीवर आपला वेगळा अजेंडा राबवत आहेत आणि अजित पवार मात्र चीनच्या भिंतीसारखे तटस्थ उभे आहेत.

या सर्व राजकीय समीकरणात खऱ्या प्रश्नाचे उत्तर मात्र समाजाला मिळत नाही. मराठा आरक्षणाच्या कायदेशीर अडचणी सर्वांनाच माहीत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने मर्यादा आखून दिलेल्या आहेत. तरीही आंदोलनं होत आहेत, उपोषणं होत आहेत, वाहतूक कोंडी होतेय, मुंबईकर त्रस्त होत आहेत. पण निर्णायक निर्णय कुठे आहे?

शरद पवार यांनीही या वादाला वेगळा टप्पा दिला आहे. ७२ टक्के आरक्षण तामिळनाडूत शक्य आहे, तर महाराष्ट्रात का नाही? त्यासाठी घटनेत बदल करण्याची भूमिका केंद्राने घ्यावी, असं ते म्हणाले. म्हणजेच चेंडू आता केंद्र सरकारकडे फेकला गेला आहे.

प्रश्न असा आहे की, राज्य सरकारने काय भूमिका घ्यायची? एकनाथ शिंदे हेच आता या कोड्याचं उत्तर देऊ शकतील का? कारण राज ठाकरे, राऊत आणि पवार यांचं वक्तव्य एकाच दिशेने इशारा करतंय, मराठा आरक्षण हा आता सामाजिक नव्हे तर थेट राजकीय निर्णयाचा विषय झाला आहे.

जरांगे उपोषणावर ठाम आहेत, समाज रस्त्यावर आहे, पण राजकीय इच्छाशक्ती कुठे आहे? राज्य सरकारनं लवकरात लवकर ठोस भूमिका घेतली नाही, तर हे आंदोलन केवळ मुंबईच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र हादरवेल.

मराठा समाज उत्तराची वाट पाहतोय... पण उत्तर अजूनही फक्त प्रश्नच आहे.

■ ■ ■

# अवैध लेआऊटमध्ये भूखंड घेणाऱ्यांना दिलासा तर विकणारे येणार रडारवर गुन्हे दाखल करण्याचा पालकमंत्री बावनकुळेंचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३० :

अवैध लेआऊटमध्ये किंवा नियमानुकूल नसलेल्या लेआऊटमध्ये भूखंड खरेदी करणाऱ्या सर्वसामान्यांचे नुकसान होणार नाही, आम्ही गुंठेवारी कायद्यातील तरतुदीनुसार भूखंड घेणाऱ्याला दिलासा देऊ. परंतु अवैध लेआऊट टाकून भूखंड विक्री करणाऱ्यांवर चौकशीअंती गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा शुक्रवारी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

जिल्हा नियोजनच्या बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. या वेळी खा. अनिल बोंडे, आ. प्रवीण तायडे, आ. राजेश वानखडे, आ. चंदू यावलकर, आ. गजानन लवटे व अधिकारी उपस्थित होते. अमरावती शहरातील ६२ वर्षे जुना



रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीसाठी अचानक बंद झाल्याने अडचण झाली.

परंतु, त्याला बंद करण्याशिवाय पर्याय नव्हता. या पुलासंदर्भात लवकरच मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी सर्व लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन चर्चा करणार आहे. यावर निर्णय होईल. नवा पूल होईपर्यंत काही पयार्यी व्यवस्था होऊ शकते का यावरही चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. येत्या तीन महिन्यात ४८ शासकीय विभागांचे प्रमुख जिल्ह्यात कार्यालयीन दौरे करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते नेमके काय काम करणार आहे, याबाबत सविस्तर माहिती प्रेझेंटेशनद्वारे आम्हाला आगामी बैठकीत ते देतील, अशा सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या आहेत.

नियोजन अधिकाऱ्याच्या चौकशीचा ठराव मंजूर तत्कालीन जिल्हा नियोजन अधिकारी अभिजित मस्के यांच्या अमरावतीमधील संपूर्ण कार्यकाळाची चौकशी करण्याचा ठराव जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजूर झाला आहे. हा ठराव नियोजन विभागाच्या प्रधान सचिवांना पाठवण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. सर्व लोकप्रतिनिधींनी मस्के यांच्या कामाबद्दल नाराजी व्यक्त केली होती. त्यानुसारच हा निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरात अजून सीसीटीव्ही नाही, मात्र नियोजन न.प.चे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आगामी काळात जिल्ह्यातील नगर पालिका स्तरावरही सीसीटीव्ही कॅमेरा बसवण्याचे नियोजन आहे. वास्तविकता मागील अनेक वर्षांपासून दोन ते तीनवेळा प्रस्ताव तयार करूनही अमरावती शहरात अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले नाहीत. परंतु नगर पालिकेच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

नागरिक ३ तास ताटकळत पालकमंत्री बावनकुळे डीपीसीची सभा घेण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्याने अनेक नागरिक त्यांना निवेदन देण्यासाठी जिल्हाकचेरीत पोहोचले. ही बैठक बंदद्वार असल्याने शासकीय विभागप्रमुख, आमदार, खासदार यांनाच प्रवेश होता. बैठक साडेतीन वाजता संपणार असे नियोजनात होते मात्र बैठक साडेसहा वाजता संपली. त्यामुळे शेकडो नागरिक तसेच काही धावपटूंना पालकमत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र दिले जाणार होते, तेही तीन ते चार तास नियोजन भवनाच्या बाहेर ताटकळत उभे होते.

# नवसाला पावणारा 'लालबागचा राजा'

अकोला : नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारा 'लालबागचा राजा' आता अकोल्यातील भाविकांच्याही हृदयाचा राजा ठरला आहे. १९८३ साली स्थापन झालेल्या माळीपुरा एकता गणेशोत्सव मंडळाने यंदा ४२ वर्षांचा मानाचा प्रवास करीत ४३ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. मोतिसिंग मोहता, तसेच स्व. बाळास्वामी माडकू आणि स्व. कोरान्नी महाराज यांच्यासह इतर सहकाऱ्यांनी 'एक गाव एक गणपती' या संकल्पनेतून मंडळाची स्थापना केली. स्थापनेपासूनच मंडळाने सामाजिक जाणिवा जोपासत 'झाडे लावा झाडे जगवा' मोहिम गरीब विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण असे उपक्रम राबवले. २००७ सालीअकोल्यातील मूर्तिकार शिवा मोकाळकर यांनी मुंबईतील लालबागच्या राजाची हुबेहूब मूत साकारली. मुंबईला न जाता येणाऱ्या भाविकांच्या विनंतीवरून मंडळाने हीच परंपरा अकोल्यात रुजवली. त्यानंतर दरवष 'अकोल्याचा राजा,लालबागचा राजा' अकोल्यात विराजमान होत असून हजारो भाविक अकोल्यातच दर्शनाचा लाभ घेत आहेत. आज या मूतवर लोकवर्गणीतून तब्बल आठ किलो चांदीचे दागिने चढवले गेले असून दरवष यात वाढ होत आहे. या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे सर्वधमयांचा उत्स्फूर्त सहभाग आहे.

# अद्यापही कृत्रिम रक्त निर्मिती साध्य नाही, रक्तदान हाच पर्याय : डॉ. संजय भोयर

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

कृषी महाविद्यालय, अकोला येथे गणोशोत्सवाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थाकडून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिरात १९ दात्यांनी रक्तदान करून शिबिर यशस्वी केले. महाविद्यालयात दरवर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते अशातच एक रक्तदान शिबिराचे या वर्षी आयोजन करण्यात आले यामध्ये मोठ्या प्रमाणात रक्त पिशव्यांचे संकलन होऊन ते गरजू रुग्णांना उपलब्ध केले जाते.

सदर रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संजय भोयर यांनी केले. याप्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. भोयर म्हणाले की, अजूनही आपल्याला कृत्रिम रक्त तयार करता आलेले नाही. त्यामुळेच मानवी रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या शरीरातील थोड्याशा रक्ताचे दान केल्यामुळे एखाद्याचे प्राण वाचत असेल तर यासारखे मोठे सामाजिक कार्य नाही. शिवाय रक्तदानामध्ये गेलेल्या रक्ताची शरीरात पुन्हा काही तासातच निर्मिती होऊन आवश्यक ती पातळी राखली जाते.




रक्तदानामुळे रक्तदात्याला कोणताही धोका नाही. उलट त्याला अधिक ताजेतवाने वाटते. याप्रसंगी प्राध्यापक डॉ. गिरीश जेऊघाले यांनी तब्बल ४१ वेळा रक्तदान केल्या बद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. तसेच इतर प्राध्यापक डॉ. अनिल खाडे(कार्यक्रम अधिकारी), डॉ. गणेश भगत डॉ. गोदावरी गायकवाड, डॉ. प्रिती तोडासम इत्यादी प्राध्यापक वर्ग उपस्थित होत. रक्त साठवणकरण्यासाठी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय ,अकोला रक्तपेढीची संपूर्ण टिम डॉ. मयुरेश वैराळे रक्त संक्रमण अधिकारी,श्री रितेश जावेकर अधिपरीचारक, सौ. मयुरी गायगोले समुपदेशक,निलेश भावनागरे, साक्षी ठोंबरे,रुपेश तायडे इ.होते. रक्तदात्यांमध्ये डॉ. गिरीश जेऊघाले , विद्यार्थी वैभव ताजणे, अजय रेंढे,अनिकेत बोडखे, कुणाल नंदगडे,मोहित मुरडिया,दीपेश कोठारी,सय्यद दानिश,आकाश सिंग जडाऊ,रोहन इंगळे,गणेश नगर, दीपक नागर, विश्वजीत, गोविंद घुले, अभय हांगे, प्रसन्न भुरेवा व इतर विद्यार्थीनी रक्तदान केले.

## वाहनाच्या धडकेत गरीब विक्रेत्याचे नुकसान!

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

सायंकाळी जोरदार पाऊस सुरू झाल्याने संसारपयोगी साहित्य, तसेच लहान मुलांची खेळणी, खाद्यपदार्थांचे पाऊच ची विक्री करणारा एक विक्रेता आपली चार चाकी गाडी घेऊन घरी परतत असताना, समोरून येणाऱ्या ऑटोने या हात गाडी जोरदार धडक दिली ही धडक इतकी जोरदार होती की त्यामुळे या चार चाकी गाडीतील संपूर्ण साहित्य जमिनीवरील चिखलात पडले होते हे सामान गोळा करताना या गरीब विक्रेताच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत होते धडक मारल्यानंतर या गरीब विक्रेत्याला मदत करण्याऐवजी ऑटो चालक आपला ऑटो घेऊन तेथून फरार झाला एक तर पाण्याने आधीच धंदा ना झाल्याने पाण्यापासून आपले सामान वाचवण्यासाठी घरी निघालेल्या या विक्रेत्याचे ऑटो ने धडक दिल्याने मोठे नुकसान झाल्याने याला नुकसान भरपाई कोण देणार? हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे

## घरगुती गॅस सिलेंडर चा अवैध वापर करणारे आरोपीना अटक

### गॅस सिलेंडर व इतर साहित्य व मुद्देमाल जप्त

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हया मध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे. आज दि. २७/०८/२०२५ रोजी आम्ही पथकासह स्था. गु. शा. कार्यालय मध्ये हजर असताना गुप्त बातमीदार कडून माहिती मिळाली कि, पोलीस स्टेशन जुने शहर हद्दीतील पातूर रोडवर दिल्ली दरबार हॉटेलच्या बाजूला बंद पडलेल्या सर्व्हिसिंग सेंटर जवळ घरगुती वापरातील गॅस सिलेंडर अवैध रित्या ऑटोमध्ये भरला जात आहे अशा माहितीवरून रेड केली असता घटनास्थळावर आरोपी नामे १) राजू उर्फ शफिख खान जमील खान वय ३२ वर्ष, रा. खीडकीपुरा जयहिंद चौक अकोला २) रिझवान अहमद मकसूद पटेल वय २६ वर्ष, रा. अंबिकानगर वाशिम बायपास अकोला हे अवैधरित्या ऑटो मध्ये गॅस भरताना मिळून आले घटनास्थळाची पाहणी केली असता घटनास्थळावर १) कझ गॅस सिलेंडरचे घरगुती वापराचे १७ रिकामे सिलेंडर किंमत अं. ८५००/- रू. २) कझ गॅस सिलेंडरचे घरगुती वापराचे २१ भरलेले सिलेंडर कि. अं. ३१५००/- रू असे एकूण ३८ सिलेंडर मिळून आले ३) गॅस भरण्याकरता वापरलेली ०२ Gold झेशी कंपनीची मशीन, ४) ०२ इलेक्ट्रॉनिक वजन काटा अं. कि. ४०००/- रू. असा एकूण ६४,०००/- रू. चा मुद्देमाल आरोपी कडून जप्त




करण्यात आला. सदर आरोपी विरुद्ध पो स्टे. जुने शहर येथे गुन्हा दाखल करण्यात येत आहे.सदरची कार्यवाही सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री अर्चीत चांडक साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री बी चंद्रकांत रेड्डी साहेब, पोलीस निरीक्षक श्री शंकर शेळके यांचे मार्गदर्शनाखाली अझख गोपाल ढोले,अंमलदारकउ/ खुशाल नेमाडे, कउ / फिरोज खान, कउ / मेहेंद्र मालिये, झउ/ राज चंदेल,झल/ अभिषेक पाठक, ऋझडख विनोद ठाकरे स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी केली.

## थोडक्यात

### भजन गायिका निधी मंत्री यांची भजन संध्या

**अकोला :** स्थानीय गीता नगर येथील



रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात राम देवबाबा जन्म ोत्सव निमित्त अनेक उपक्रम सुरू असून त्यास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या उत्सवात मंगळवार दि २ सप्टेंबर भादवा सुदी दशमीवर साय ७ वाजता ख्यातीप्राप्त भजन गायिका सौ निधी मंत्री यांच्या संगीतमय भजन संध्येचे आयोजन करण्यात आले आहे.या भजन संध्येत सौ निधी मंत्री रामदेवबाबा यांच्या जीवन अवतार कार्यावर संगीतमय भजने सादर करणार आहेत. या उत्सवात रामदेवबाबा यांची दिव्य ज्योत साकार करण्यात येणार असून विहंगम झाकी साकार करण्यात येणार आहे.रामसा पीर रामदेवबाबाच्या महिला पुरुष भक्तांनी या भक्तिमय व संगीतमय भजन संध्या व दिव्य ज्योत दर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन राम देवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती समितीचे सुभाष भट्टड यांनी दिली.

### भागवत कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन

अकोलाः महानगरात पितृपक्षाच्या पावन पर्वावर दिनांक १४ ते २० सप्टेंबर २०२५ पर्यंत नित्य दु २ ते साय ५ वाजेपर्यंत रिंग रोड येथील जानोरकर मंगल कार्यालयात सात दिवसीय श्रीमदब भागवत कथा सप्ताह व किर्तन उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या भागवत कथेत पु सद्गुरुदेव सुधांशु महाराज यांचे शिष्य आचार्य शिवदत्त महाराज हे संगीतमय भागवत कथा सादर करणार आहेत.पितृपक्षात कथा श्रवणाने पितरांचे तारण, सद्गुणांचा विकास व जीवनात आनंद शांतीची वृद्धी होते असे शास्त्रात सांगितले आहे. या उत्सवात नित्य रात्री ८ वाजता कीर्तन उत्सव होणार आहे. या कीर्तनात हभप उमेश महाराज दशरथे आळंदी, हभप विजय महाराज शास्त्री, हभप शिवा महाराज बावस्कार बुलढाणा, हभप ज्ञानेश्वर महाराज शिंदे आळंदी, हभप भगीरथ महाराज काळे सिन्नर, हभप जगन्नाथ महाराज पाटील मुंबई आदी आपले किर्तन सादर करणार आहेत. कथा प्रारंभ प्रसंगी दि १५ सप्टेंबर रोजी दु १२ वाजता भव्य शोभायात्रा निघणार असून ही शोभायात्रा आनंद निकेतन सत्संग भवन वरून कथास्थळ पर्यंत निघणार आहे.

### भक्तिरसात न्हाऊन निघाला शिवणीतील पंचमी उत्सव

**अकोला :** श्री समर्थ सतगुरु सेवा समिती शिवणी व्दारा संचालित श्री गजानन महाराज मंदिरात पंचमी निमित्त दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन भक्तिभावाने संपन्न झाले. संध्याकाळी श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचे वैदिक मंत्रोच्चारात पूजन, सामूहिक आरती व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

## गणेशघाट,विसर्जन मार्ग आणि ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाची पाहणी

### आ. साजिद पठाण यांनी पाहणीदरम्यान मनपा अधिकाऱ्यांना दिले विविध निर्देश

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

शहरातील सर्व गणेश घाटांना स्वच्छ, सुंदर आणि आध्यात्मिक स्वरूप द्या, सोबतच गणेश विसर्जन मार्गावरील आणि ईद मिलादुन्नबी निमित्त निघणाऱ्या जुलूस मार्गावरील खड्डे तत्काळ बुजवा, या धार्मिक काळात नागरिकांना स्वच्छ व प्रसन्न असे वातावरण वाटावे यासाठी कार्य करा असे निर्देश आ. पठाण यांनी शनिवारी मनपा अधिकाऱ्यांना गणेशघाट, विसर्जन मिरवणूक म ार्ग आणि ईद मिलादुन्नबी जुलूस मार्गाच्या पाहणीदरम्यान दिले. यावेळी मनपाचे कार्यकारी अभियंता अजय गुजर, विद्युत विभागाचे अधिकारी रवींद्र वाकोडे, स्वच्छता विभागाचे संजय खोसे यांच्या सह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. शहरात गणेशोत्सवाची धूम सुरू आहे. संपूर्ण शहरात आध्यत्मिक



वातावरणात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. दहा दिवस सर्व नागरिकांच्या घरात, सार्वजनिक गणेशोत्सव मंडपात मोठ्या श्रद्धा, सुमनात गणेशजीची पूजा, अर्चना पार पाडली जाते.

तर येत्या ६ सप्टेंबर रोजी अनंतचतुर्दशी दिनी गणेशजीच्या विसर्जन पार पडणार असून महानगर पालिकेच्यावतीने गणेश घाटाची निर्मिती करण्यात येते. या गणेश घाटांवर नागरिक आपल्या घरातील गणेश मूर्तीचे मोठ्या भक्ती भावाने विसर्जन करीत बाप्पांना निरोप देतात. अश्यावेळी नागरिकांना ही गणेश घाट स्वच्छ, सुंदर आणि आध्यात्मिक असे वाटावे सोबतच या गणेश घाटांवर विद्युत रोषणाईचा पुरेपूर बंदोबस्त करण्यात यावा. यासोबतच यंदा गणेश घाटांना आकर्षित असे तयार करण्यात यावे असे निर्देश आ. पठाण यांनी सिटी कोतवाली गणेश घाट आणि हरिहर पेठ गणेशघाट पाहणी दरम्यान दिले. यावेळी गणेश विसर्जन मार्गाची पाहणी करीत सदर मार्गावरील खड्डे तत्काळ बुजविण्याचे आदेश त्यांनी यावेळी यंत्रणेला दिले. यावेळी महानगर अध्यक्ष डॉ. प्रशांत वानखडे, जावेद जकारिया, कपिल रावदेव, पराग कांबळे, रवी शिंदे, आकाश कवडे, अंकुश तायडे, अभिजित तवर, गणेश कळसकर, विजय जामनिक, अथर्व राऊत, अथर्व ढोरे, विनोद मराठे, विशाल पाचपोर, बाबू दौंड, बंटी भोंडे, सिद्धार्थ शिरसाट, ॲड. ओम खंडारे, फिरोज गवळी, सैय्यद शहजाद यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## प्रभातचा आराध्य रानडे जलतरण स्पर्धेत विभागस्तरावर

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

प्रभात किड्स स्कूलचा आराध्य रानडे ह्याने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये आराध्याने आपल्या खेळामध्ये चमकदार कामगिरी करून उत्कृष्ट यश प्राप्त केल्याने आराध्यची विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे.क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन वसंत देसाई स्टेडीयम, अकोला येथे दि. २० ऑगस्ट दरम्यान करण्यात आले होते. जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलांमध्ये आराध्य रानडे (१०० मिटर बॅक स्ट्रोक) ह्याने घवघवीत यश प्राप्त केले. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समनव्यक मो. आसिफ व क्रीडा विभाग प्रमुख स्वप्निल मांदाळे व उप-विभागप्रमुख आशिष बेलोकार यांच्यासह शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचार्यांनी आराध्य रानडेचे कौतुक केले.




## सावकाराकडे गहाण मिळकतीबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

जुन्या शहरातील एका अवैध सावकाराकडे गहाण असलेल्या मिळकतीबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी केले आहे.जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे दि. ७ फेब्रुवारी २०२४ रोजी राबविलेल्या धाडसत्रात पप्पू उर्फ मनोज वानखडे (जयहिंद चौक, जुने शहर) विनापरवाना सावकारी करताना आढळल्याने कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडे ज्या व्यक्तींनी कर्जाचे तारण म्हणून मालमत्ता गहाण ठेवली होती, त्यांनी लेखी दावा आवश्यक पुराव्यासह करावा. कर्जदाराचे निधन झाले असल्यास वारसांनी दावा करावा.अशा संबंधित व्यक्तींनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सहकार संकुल, आदर्श कॉलनी, अकोला येथे दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वा. ते सायंकाळी ५.३० वा. या वेळेत मालमत्तेच्या कागदपत्रांची पाहणी करावी आणि दि. १० सप्टेंबर ते १९ सप्टेंबर दरम्यान मालमत्तेबाबत दावे सादर करावेत. त्यानंतर आलेल्या दाव्यांचा विचार होमार नाही व मालमत्ता शासनाकडे जमा होईल, असे जिल्हा उपनिबंधकांनी कळवले आहे.

## युवकांनी क्रीडा विश्वात नाव उज्वल करावे :डॉ मालोकार

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

ज्येष्ठ हॉकीपटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात येत असते या अनुषंगाने या क्रीडा दिनावर शुक्रवारी रेडक्रॉस सोसायटी विदर्भ कॅरम असो. तथा अकोला महानगर डिस्ट्रिक्ट चेस असो.च्या संयुक्त विद्यमाने आयोजित क्रीडा दिन कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ किशोर मालोकार यांच्या अध्यक्षतेत संपन्न या सोहळ्यात अकोला जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाणारे बहुआयामी व कर्तबगार जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ सतीशचंद्र भट यांचा शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. मालोकार यांनी राष्ट्रीय क्रीडा दिन ज्यांच्या स्मृतीत साजरा करण्यात येतो असे हॉकीचे जादूगार म्हणून ओळखल्या जाणारे मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा



विश्वाचा आलेख सादर करीत युवकांनी क्रीडा विश्वात आपलं नाव उज्वल करण्याचे आवाहन केले. यावेळी रेडक्रॉसचे सचिव प्रभजीत सिह बछेर,अँड सुभाषसिंह ठाकूर,प्रशांत राठी,राजू बुडकले,अकोला महानगर डिस्ट्रिक्ट चेस एसो. चे अध्यक्ष संदीप पुंडकर,सचिव जितेंद्र अग्रवाल, तनवीर अहमद खान आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## भौरद पुलाजवळ रिकामा डिझेल टँकर नदीत कोसळला; जीवितहानी टळली

■भौरद,दि ३० (प्रतिनिधी) :

दिनांक २९ ऑगस्ट रोजी, नांदेड येथून गायगाव डेपोच्या दिशेने जात असलेला रिकामा डिझेल टँकर (वाहन क्रमांक चक २६ अऊ २१३१) डाबकी पुलाजवळून जात असताना अचानक नियंत्रण सुटून नदीत कोसळला. सुदैवाने, या अपघातात टँकर चालक गणेश अहंकारे व सोबत असलेले विजय अमरतवार हे दोघेही सुरक्षित असून त्यांना कोणतीही इजा झाली नाही. सदर टँकर हा डिझेल भरण्यासाठी गायगावकडे निघाला होता. सध्या टँकर नदीतील पुराच्या पाण्यात अडकलेला आहे. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला असून पुढील कारवाई सुरू आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## अकोला महानगरपालिका प्रशासनाव्दारा गणेशोत्सव -२०२५ अंतर्गत

# पर्यावरणपूरक घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी स्पर्धांचे आयोजन



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :

घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने स्वच्छ भारत अभियान २.० आणि माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत व मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा याकरिता अकोला मनपा प्रशासनाव्दारा गणेशोत्सव - २०२५ अंतर्गत घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

पर्यावरणपूरक घरगुती गणेश उत्सवामध्ये सहभाग घेणा-या नागरिकांनी त्यांच्या घरी स्थापित केलेली मुर्ती ही पर्यावरणपूरक अर्थात शाडू मातीची असावी, या उत्सवा दरम्यान किमान दोन वृक्षरोपण व संवर्धन करणे, सजावट व देखावे याम ध्ये माझी वसुंधरा, कचरामुक्त, प्लास्टीक मुक्त व वातावरणीय बदल (ऋश्रेलरश्र थरीाळस) यांचा समावेश असावा, www.majhivasundhara.in या संकेत स्थळावर जाऊन हरित शपथ घेऊन ई-प्रमाणपत्र प्राप्त करून अकोला महानगरपालिकेच्या वेब साईटवर पेजला टॅग करणे याचसोबत फसबुक, ट्वीटर व अन्य सोशल मिडीयावर प्रसार करणे, गणेश मुर्तीसह सहपरिवार सेल्फी फोटो घेणे, मुर्तीचे विसर्जन हे पर्यावारण पूरक अर्थात घरगुती किंवा कृत्रीम तलावामध्ये करावे. या सर्व प्रकारांवर गुणांकन देण्यात येणार आहे. घरगुती गणेशोत्सव स्पर्धा अंतर्गत पहिले बक्षीस रू. ११०००/- रोख, व्दितीय बक्षीस रू. ७०००/- रोख, तिसरे बक्षीस रू. ५०००/- रोख यासह स्पर्धेत भाग घेणा-या नागरिकांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल. पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेश उत्सवामध्ये सहभाग घेणा-या मंडळांनी नियमानुसार लागणा-या सर्व परवानगी असणे आवश्यक आहे, गर्दी व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, आपात्कालीन परिस्थितीसाठी आपत्ती व्यवस्थापन तसेच पर्यावरणपूरक देखावे ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण उपक्रम, वृक्षारोपण, माझी वसुंधरा, प्लास्टीक मुक्त शहर, वातावरणीय बदल (Global Warmig) तसेच आरोग्य उपक्रम जसे आरोग्य शिबीर, रक्तदान, महिला आरोग्य तपासणी रक्त तपासणी ईत्यादी उपक्रम तसेच स्वच्छता मध्ये स्वच्छता पथनाट्य, स्वच्छता दिंडी/रॅली, कचरा मुक्त अकोला वर निबंध, श्लोगन , निर्माल्य व्यवस्थापन ईत्यादी उपक्रम राबविणे. या सर्व प्रकारांवर गुणांकन देण्यात येणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा अंतर्गत पहिले बक्षीर रू. ५१०००/- रोख, व्दितीय बक्षीस रू. ३१०००/- रोख, तिसरे बक्षीस रू. २१०००/- रोख यासह स्पर्धेत भाग घेणा-या नागरिकांना प्रशस्तीपत्र देण्यात येईल. या स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी घरगुती व सार्वजनिक गणोशोत्सव मंडळांनी अकोला महानगरपालिकेच्या ु.रालरझेश्रर. ळप या संकेत स्थळावर दि. ३० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत ऑन लाईन अर्ज करावा किंवा कार्यालयीन वेळेत अकोला महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय येथील स्वच्छता विभाग कार्यालय याचसोबत अकोला महानगरपालिकेच्या पुर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण झोन कार्यालय येथे ऑफलाईन अर्ज करावा. सदर स्पर्धा अंतर्गत सहभागी झालेले मंडळ व नागरिक यांचे कडील पर्यावरणपूरक गणेशोत्सव बाबत निरीक्षण करून गुणांकन देण्याकरिता प्रशासनाव्दारा ७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीव्दारा प्रत्यक्ष निरीक्षण करून गुणांकन अहवाल सादर करण्यात येणार आहे.

# काकांचा संयम ढळला?

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसे डॅशिंग व्यक्तीमत्व. शेतीला पाणी देण्यासाठी, नहरात पाणी सोडण्यासाठी ते कधी कोणत्या धरणात ..णार? याचा अंदाज कोणालाच नाही. आमचे एक मित्र बारामतीला अधिकारी असतानाचे अनेक प्रसंग ते सांगतात. दादांचा कामाचा धडाका मोठा आहे. आठवडा, पंधरा दिवसात ते तिकडे बैठका घ्यायचे, लोकांची अडली नडली कामे करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना झापायचे, सर्वांसमोर कानउघाडणी करायचे. अर्थात, जनतेची कामे करण्यात त्यांचा हात कुणी पकडू शकत नाही, असे आमचे ते मित्र ठासून सांगायचे. काँगेससोबत अनेक वर्षे आणि नंतर उद्धव ठाकरेंसोबतच्या महाविकास आघाडीमध्ये असताना हेच दादा भाजपावर सडकून टीका करायचे, आसूड ओढायचे. नागपूर दौऱ्यात संघाच्या मुख्यालयात ते गेले नाहीत, हेडगेवार यांच्या पुतळ्यासमोर नतमस्तक झाले नाहीत. पण, सत्तेसाठी माणूस किती लाचार होतो? ज्या काकांनी त्यांना बोट धरून चालायला शिकवले, राजकारणात आणले, उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहचविले, त्याच काकांच्या म्हणजे शरद पवारांच्या पाठीत खंजीर खुपसून दादांनी उपकाराची परतफेड केली. राष्ट्रवादी काँग्रेसचा हा गट फुटणे, फोडणे, यातही मोठी गोम असल्याचे बोलले जात आहे. ज्या भाजपावर आणि त्यांच्या पितृसत्ताक संघटनेवर दादा टीका करायचे त्याच पक्षासोबत त्यांनी घरठाव केला. विकासासाठी आम्ही हा निर्णय घेतल्याचे ते कितीही सांगत असले तरी, सत्तर हजार कोटींचा सिंचन घोटाळा, त्यांच्या सग्या सोबत्यांचे अरबो रुपयांचे घोटाळे दाबण्यासाठी, ईडी आणि अन्य तपास यंत्रणांचा ससेमिरा टाळण्यासाठी त्यांना महायुतीत जमवून घ्यावे लागले, हे सर्वश्रूत आहे. महायुतीत आल्यानंतर ज्या काकांना ते नेहमी उत्तर देतात, तीच वेळ आज काका म्हणून त्यांच्यावर आली आहे. आमदार असलेले पुतणे रोहित पवार सवाल करू लागले आहेत आणि काका म्हणून संयमित उत्तर देण्याऐवजी या दादा काकांचा संयम ढळू लागला आहे. चुरूचुरू बोलायला लागलास... हे त्यांचे वक्तव्यच अंतर्गत निराशेचे द्योतक आहे.





**पंचनामा**
**मनोज बागडे**

भावकीने लक्ष दिले म्हणूनच तू निवडून आलास, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार रोहित पवारांच्या गावकीच्या नादात भावकी विसरल्याच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. यावेळी त्यांनी आपल्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवत रोहित यांना अप्रत्यक्षपणे आपल्या नादाला न लागण्याचाही सल्ला दिला. परंतु, आमदार रोहित पवार अर्थात आपल्या पुतण्यावर टीका करताना उपमुख्यमंत्री आणि एक काका म्हणून अजित पवार तेवढे खुश होते का?

रोहित पवार यांनी सांगलीच्या इस्लामपूर येथे आयोजित एका कार्यक्रमात अजित पवारांना भावकीची आठवण करून दिली होती. अजित पवारांना गावकीच्या नादात भावकीचा विसर पडला आहे. त्यांनी निधीच्या बाबतीत कुठेतरी याचा विचार करावा, असे ते म्हणाले होते.

त्यानंतर अजित पवारांनी लागलीच त्यांच्या या विधानाचा खरपूस समाचार घेतला. रोहित म्हणाला की दादांचे गावकीकडे लक्ष आहे, भावकीकडे नाही. पण भावकीकडे लक्ष दिले म्हणूनच तू आमदार झालास. आपण पोस्टल बॅलेटवर निवडून आला आहात हे लक्षात असू द्या. जयंतराव (जयंत पाटील) त्याला विचारा, किती मते पडली आहेत? असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी हसत रोहित यांना आपल्या नादी न लागण्याचाही सल्ला दिला.

मी महायुतीत गेल्यापासून कुणावरही टीका केली नाही. तुम्ही तुमच्या विचाराने चालत आहात, मी माझ्या विचाराने चालत आहे. पण त्यात आम्ही फुले शाहू आंबेडकरांच्या विचारधारेशी कुठेही तडजोड केली नाही. मला रोहितने सांगितले की, जयंत पाटील व मी हेलिकॉप्टरने जाईन. त्यावेळी मला वाटले की, ते माझे भाषण ऐकायला दोघेही नसणार. पण माझे नशीब बघा हे दोघेही भाषण ऐकायला आहेत, असे ते म्हणाले.

**खूप चुरूचुरू बोलायला लागलाय**

मी रोहितचे भाषण ऐकत होतो. खूप चुरूचुरू बोलायला लागला आहे, असे सांगून अजित पवारांनी स्वतःचे उदाहरण दिले. ते म्हणाले, 1990 साली मी, जयंत पाटील आर. आर. पाटील पहिल्यांदाच आमदार म्हणून निवडून आलो. 1990, 1995 आणि 1999 असे तीन टर्म लागोपाठ निवडून आल्यानंतरही 1999 च्या आघाडी सरकारच्या काळात आम्हाला फार स्पेस मिळाली नाही. 2004 साली थोडी संधी मिळाली. पण हल्ली काही काही जणांना पहिल्या टर्मलाच भाषणबाजी करायची असते. मी म्हणजे कुणीतरी मोठा अशा अर्विभावात ते दुसऱ्या पक्षालाही सल्ले देत फिरतात.

**मग आम्ही देखणे नाही काय?**

अजित पवारांनी यावेळी जयंत पाटील हे आवाजात प्रेमळपणा असणारे देखणे व्यक्तीमत्व असल्याच्या एका उल्लेखाचा दाखला दिला. जयंत पाटील म्हणजे देखणे नेतृत्व. मग आम्ही देखणे नाही काय? कार्यक्रमाला वाळव्यात बोलवायचे आणि आमचीच बिन पाण्याने करायची, असे ते म्हणाले. त्यांचे हे विधान ऐकताच कार्यक्रमस्थळी एकच हशा पिकला.

तत्पूर्वी, रोहित पवारांनी आपल्या भाषणात अजित पवारांना टोला हाणला होता.

ते म्हणाले होते, काही वर्षांपूर्वी अधिवेशनात मी भाषण केले होते. अनेक लोकांनी सांगितले की, भाषण चांगले झाले. मग मला अजितदादांचा फोन आला. त्यावेळी आम्ही पार्टी म्हणून एकत्र होतो. त्यांनी मला घरी बोलावले. माझी अपेक्षा होती की, ते माज्या भाषणाचे कौतुक करतील. अजून चांगले भाषण कर असे म्हणतील.

पण त्यांनी सांगितले, भाषण चांगले झाले, पण एक महत्त्वाची गोष्ट तुला सांगतो. भाषण देत असताना कॅमेरा तुज्यावर फोकस असतो. त्यामुळे शर्टचे वरचे बटण वगैरे लावत जा. त्यांचे एवढे बारीक लक्ष माज्यावर होते. आता ते गावकीचा विचार करतात, पण भावकीचा विचार कुठेतरी विसरलेत. कुठेतरी निधीच्या बाबतीत त्यांनी विचार करावा, असे ते मिश्किलपणे म्हणाले.

खरे तर अजित पवारांनी आमदार रोहित पवार यांच्या टीकेला उत्तर देताना जे वक्तव्य केले ते पूर्णतः निराशा आणि रागाने भरलेले आहे. त्यांच्या विधानात एक प्रकारचा अहंकाराचा दर्प आहे, धमकी आहे. माझ्यामुळे तुम्ही आहात, माझे काहीच वाकडे करू शकत नाही, या अविर्भावात त्यांनी घरच्यांनाही संकेत दिल्याचे दिसून येते.

सत्तेत सहभाग मिळाल्याने, अजित पवार यांचे पक्षातील निकटवर्तीय जसे प्रफुल पटेल आणि अन्य काही नेते हवेत वावरताहेत. पण, काही गोष्टी ते विसरलेत की सोबतीला घेवून, भाजपा त्यांच्याच घरात घुसतो आहे. सहकार क्षेत्रात स्वतःची मक्तेदारी निर्माण करतो आहे. मारकुंड्या सूरज चव्हाणला आधी निलंबीत केले आणि पुन्हा थेट राष्ट्रीय स्तरावर सरचिटणीस केल्याने दादांच्या पक्षात अंतर्गत प्रचंड धुसफूस आहे.

सरकारमध्ये उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी गटात प्रमुख म्हणून पदावर आरूढ अजित पवार पक्षातील ऑलबेलविषयी हसून एव्हरीथिंक इज ओके असे सांगत फिरत असले तरी ओके नक्कीच नाही. विदुषकाचे सोंग घेवून हास्य पेरता येवू शकेल. पण आतल्या रडगाण्याचे काय?

रोहित पवारांनी ओढलेल्या आसूडामुळे अजित पवार कमालीचे हादरल्याचे दिसते. त्यांचा संयम ढळू लागला आहे. त्यांच्या सोबतची शिंदेसेना आणि भाजपालाही हेच हवे आहे. पिंजऱ्यातील पोपटाने शिळच घालायची असते, दुसऱ्यावर डाफरायचे नसते, हे त्यांना कुणी सांगावे?

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व : प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. पाच वर्षांपूर्वी ३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडाला होता कारण प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक ऋषितल्य व्यक्तिमत्व होते.

-----------------



प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एकमेव असे व्यक्ती होते की ज्यांच्याविषयी सर्वसामान्य नागरिकांपासून ते पंतप्रधानांपर्यंत आणि सत्ताधारी पक्षांपासून विरोधी पक्षांपर्यंत सर्वांनाच कमालीचा आदर होता.

भारतीय राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले प्रणव मुखर्जी यांना भारतीय राजकारणातील भीष्म पितामह म्हणावे लागेल कारण जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी भारतीय राजकारणात घालवले.

त्याचा जन्म ११ डिसेंबर १९३५ चा. त्यांचे वडील स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. त्यासाठी त्यांनी दहा वर्ष कारावासही भोगला. प्रणव मुखर्जी यांचे वडील काँग्रेस कमिटीचे सदस्य होते तसेच पश्चिम बंगाल विधानपरिषदेचे अध्यक्ष होते त्यामुळे लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले.

प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता येथील विद्यासागर विद्यापीठातून एम ए आणि एल एल बी केले. राजकारणात येण्याआधी त्यांनी काहीकाळ प्राध्यापक म्हणून नोकरी केली तर काहीकाळ पत्रकारिताही केली. पण लहानपणीच राजकारणाचे बाळकडू मिळाल्याने त्यांनी १९६९ साली राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या वक्तृत्व, कर्तृत्व आणि नेतृत्वाच्या जोरावर मंत्रिपदापर्यंत मजल मारली.

आपल्या तल्लख बुद्धीने आणि दूरदृष्टीने त्यांनी त्या पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. नियोजन आयोगाचे अध्यक्ष, राज्यसभेचे आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते, गृहमंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री तसेच विविध संसदीय समित्यांची अध्यक्षपदे अशी अनेक महत्त्वाची पदे त्यांनी भूषवली. या सर्व पदांवर त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला.

प्रणव मुखर्जी हे त्यांच्या विविध लोकाभिमुख निर्णयाने देशभर चर्चेत राहिले. राष्ट्रपतीपद ग्रहण करण्यापूर्वीपासूनच संसदीय लोकप्रणालीत अद्ययावत माहिती ठेवणारे नेते म्हणून प्रणव मुखर्जी यांची ख्याती होती. लोकसभेत विविध पदे भूषवताना संसदेच्या आवारात अगदी विरोधी पक्षातील दिग्गज नेतेही त्यांच्याशी महत्वाच्या प्रश्नांवर चर्चा करताना आढळत.

नव्या खासदारांसाठी त्यांचे भाषण, संसदीय आयुधे वापरून प्रश्न उपस्थित करणे हे प्रशिक्षणच होते. गृह, अर्थ, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण याबाबतचे त्यांचे ज्ञान चकित करणारे होते त्यामुळेच त्यांना भारतीय राजकारणात व ज्ञानी वर्तुळात संसदीय प्रणालीची एक चालती बोलती लायब्ररी संबोधले जायचे म्हणूनच राष्ट्रपतीपदी त्यांची निवड झाल्यावर एका योग्य नेत्याची निवड झाली अशीच भावना संपूर्ण देशाची झाली होती.

राष्ट्रपतीपद हे घटनेतील सर्वोच्चपद आहे. या पदाला एक मान आहे, प्रतिष्ठा आहे. एक वेगळा शिष्टाचार असलेले हे पद आहे. राष्ट्रपतीपदी निवड झाल्यानंतर त्यांनी या पदाची प्रतिष्ठा वाढवण्याचेच काम केले.

प्रणव मुखर्जी यांनी राष्ट्रपती पदाच्या पूर्वी लावले जाणारे महामहीम हा शब्द न वापरण्याची प्रशासनाला सूचना केली. हे पद आणि त्याची समावेशकता वाढवण्याचा हा महत्वाचा निर्णय होता. भारतीय लोकशाहीचा इतिहास जगाला सांगणारा, जगाची भाषा समजणारा एक ऋषितुल्य वक्ता याठिकाणी विराजमान असल्याचे समाधान देशाला मिळाले.

३१ ऑगस्ट २०२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाची कधीही भरून न निघणारी हानी झाली. त्याच्या निधनाने भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व हरपले. भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी राष्ट्रपती स्वर्गीय प्रणव मुखर्जी यांना त्यांच्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन !



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

# इन्कमटॅक्स धाडी मध्ये जुनी सोन,चांदी ज्वेलरी रुपात सापडल्यास टॅक्स लागतो का?

सर्वात आधी वाचकांचे प्रश्नोत्तर बघणार आहोत; जे सर्व वाचकांना उपयोगी ठरावे.

**प्रश्न** – मी एक अतिज्येष्ठ सदस्य आहे. मी वृतपत्रात नेहमी कायद्याचा सल्ला वाचत असतो. मी विक्रीकर विभागाचा माजी अधिकारी असून, एल.एल.बी. (वकील) आहे. मुंबईत गेली 40 वर्षे कर सल्लागार म्हणून काम केले. सद्या पुण्यात स्थाई असून, भारताचे प्रसिद्ध उद्योजक डालमिया, नाहर, ओसवाल यांच्याबरोबर आमचा वरिष्ठ मित्र ग्रुप आहे.

आमच्या ग्रुपचा प्रश्न आहे की स्वकष्टातून बांधलेला बंगला भोपाळ येथे आहे. हा बंगला विकून पुण्यात दोन फ्लॅट घेणे आहे. भोपाळ येथील बंगल्याची किंमत सहा कोटी आहे तर आम्हाला कॅपिटल गेन टॅक्स लागेल का? माझे वय 93 वर्ष असून, मी इन्कमटॅक्समध्ये अति ज्येष्ठ नागरिक आहे.

**ॲड. एकनाथ गांगल**
**ए – 302, प्रीस्टाइन प्रोफाईल, फेज-1, वाकड, पुणे. (8879842882)**

● आपला प्रश्न व्यावहारिक आहे. इन्कमटॅक्स कायद्यानुसार आपल्याला कलम 54 खाली वजावट मिळेल. या वजावटीमुळे आपल्याला इन्कमटॅक्स म्हणजे कॅपीटल गेन टॅक्स लागणार नाही. मात्र, त्याच्या ज्या अटी असतात, त्या आपल्याला पूर्ण कराव्या लागतील. विविध हायकोर्ट तथा सुप्रीमकोर्टाने यास विविध केसेसमध्ये मान्यता दिली आहे.

**प्रश्न** – इन्कम टॅक्सच्या धाडीमध्ये 6 वर्षापुर्वीचीज्वेलरी सापडल्यास ती ज्वेलरी इन्कमटॅक्स अधिकारी जप्त करू शकतात का? जप्तीशिवाय दुसरी काही कारवाई करू शकतात का?

● सोप्या भाषेत वरील प्रश्नाचा अर्थ असा आहे की, करदात्याकडे इन्कमटॅक्सची धाड पडलेली आहे. त्या धाडीमध्ये यांना खूप सोनं किंवा ज्वेलरी सापडली आहे. विशेष म्हणजे करदात्याकडे सोन्याचे बिल आहे.

परंतु, इन्कमटॅक्सवाल्यांचे स्पष्ट म्हणणे आहे की, या सोन्याची खरेदी ही काळ्या पैशातून केली आहे म्हणून आम्हाला त्याची जप्ती करून त्या सोन्यावर इन्कमटॅक्स लावायचा आहे. तर अशा प्रसंगी ते धाडीत आलेले अधिकारी टॅक्स लावू शकतात की नाही.

याचे सोप्या भाषेत उत्तर असे आहे की, जर हा खरेदीचा व्यवहार पावतीद्वारे सिद्ध झाले की सहा वर्षापूर्वीचा आहे, तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या व्यवहारास डमी (बनावट) म्हणून चॅलेंज करु शकत नाहीत.

**प्रश्न** – इन्कमटॅक्स अधिकारी यांना करदात्याच्या घरी एका महिलेकडे सोनं सापडले तर त्या सोन्यास अधिकारी जप्त करू शकतात का?

● याच्या दोन शक्यता (संधी) असू शकतात. पहिली शक्यता म्हणजे त्या महिलाकडे जुने सोने खरेदीचे बिल आहे. अशा वेळेस त्या महिलेस जर बील सहावर्षा पूर्वीचे असेल तर इन्कमटॅक्स अधिकारी काही प्रश्न विचारण्याचा प्रश्न येणारच नाही.

याला दुसरी शक्यता अशी की, त्या महिलेकडे बिल नाही तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या महिलेस प्रश्न विचारून ते सोने जप्त करू शकतात का? गंमत म्हणजे येथेसुद्धा इन्कमटॅक्स अधिकारी प्रश्न विचारून जप्त करू शकत नाही.




कारण जुने परिपत्रक क्र.1916 जे 11 मे 1994 चे आहे, त्यात स्पष्ट सुचना आहे की, जर महिलेकडे सोन्याचे बिल नसेल मात्र सोनं सर्कुलर प्रमाणे असेल, तर इन्कमटॅक्स अधिकारी त्या महिलेचे सोने जप्त करु शकत नाहीत. मुळात त्यांना तसे अधिकारच नाही.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**

**प्रश्न** – समजा वरील प्रश्नातच त्या महिलेकडे सोने कमी सापडले तर सोनं त्या महिलेने विकून टाकले म्हणून कारवाई करू शकतात का?

● हा प्रश्न फार महत्वाचा आहे की, अनेक जागी महिलांकडे सोन्याचे धबाड सापडतच असते व अधिकारी ते सोनं जप्तही करतात. परंतु, एका केसमध्ये सोनं प्रमाणापेक्षा कमी सापडले म्हणून अधिकाऱ्यांनी सोने विकले गेले म्हणून त्यांच्यावर इन्कमटॅक्स लावला.

या इन्कमटॅक्सला कॅपिट गेन टॅक्स म्हणतात. कोर्टाने स्पष्ट संकेत दिलेले आहे की, अशा वेळेस बळजबरी सोनं विकले असे म्हणून त्या महिलेकडून इन्कमटॅक्स वसुल करता येत नाही.

ज्या वाचकांना इन्कमटॅक्ससंबंधी काही प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या नंबरवर फक्त व्हॉट्सॲप करावे, ज्याची उत्तरे याच पेपरच्या लेखमालेत विनामुल्य देण्यात येतील.

# सुपरस्टार विजयचे कडवे आव्हान!

सिंहाला गर्दीमध्ये कसं रहायचं हे समजतं आणि एकटं कसं रहायचं हेही समजतं. सिंह गुहेतून बाहेर पडतो, शिकार करण्यासाठी, कुणाची करमणूक करण्यासाठी नाही. सिंहाच हे वैशिष्ट्य सांगून, स्वतःची तुलना सिंहाशी करणारा तामिळनाडूमधील सुपरस्टार विजय हा आपला नवीन पक्ष (तमिलगा वेत्री कळघम) बरोबर घेऊन राज्याच्या राजकारणात उतरला असून, त्याने राज्यातील प्रस्थापित पक्ष, द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या समोर कडवे आव्हान उभे केले आहे.

एखाद्या सिनेस्टारने राजकारणात प्रवेश करणे ही गोष्ट तामिळनाडूसाठी नवीन नाही. याअगोदर शिवाजी गणेशन, एम. जी. रामचंद्रन, जयललिता, विजयकांत, कमलहासन यांनी राजकारणात उतरुन आपली ताकद तिथे दाखवून दिली आहे. नुकतीच सिनेस्टार विजयने तामिळनाडूतील मदुराई येथे आपल्या पक्षाची जी परिषद घेतली, तिला विजयच्या फॅन्सनी जी प्रचंड गर्दी केली ती पाहता, विजयला आणि त्याच्या पक्षाला लाईटली घेणे, सत्ताधारी द्रमुक आणि अण्णा द्रमुक या तामिळनाडूमधील महत्त्वाच्या पक्षांना महागात पडू शकेल.

सध्या तामिळनाडूच्या राजकारणात द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडी सत्तेवर असून, त्या आघाडीत कॉंग्रेस, डावे पक्ष आणि इतर छोट्या पक्षांचा समावेश आहे. अण्णा द्रमुक हा प्रमुख विरोधी पक्ष असून, त्याच्या नेतृत्वाखालील आघाडीत भाजपा, पीएमके आणि इतर छोटे पक्ष आहेत.

सिनेस्टार विजयने आपला पक्ष एकट्याच्या बळावर तामिळनाडूमधील विधानसभा निवडणुका लढेल,असे अगोदरच जाहीर केले आहे. तामिळनाडूमध्ये पुढील वर्षी विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.विजयचा पक्ष स्वबळावर लढणार असल्याने, तामिळनाडूमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

विजयने जाहीर केले आहे की राज्यातील सत्ताधारी द्रमुक हा पक्ष आपला राजकीय विरोधक असून भाजप हा आपला वैचारिक विरोधक आहे. भाजप हा प्रतिगामी पक्ष असून, त्याच्या बरोबर आपण कधीही युती करणार नाही, असे त्याने स्पष्ट केले आहे. त्याने स्वतःला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार म्हणून घोषित केले असून, कोणत्याही परिस्थितीत द्रमुकला सत्तेवरून खाली खेचण्याचा त्याने पण केला आहे.



त्यानंतर द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष आलटून पालटून तामिळनाडूमध्ये सत्तेवर आले. १९६७ मध्ये कॉंग्रेसचा पराभव झाल्यानंतर, जनतेने आजवर कोणत्याही राष्ट्रीय पक्षाला राज्यात सत्तेवर येऊ दिले नाही.

१९७२ साली एम. जी. रामचंद्रन हे द्रमुक मधून बाहेर पडले आणि त्यांनी अण्णा द्रमुक या पक्षाची स्थापना केली. १९७७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये एम. जी. रामचंद्रन यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुक या पक्षाने विजय मिळवला आणि एम. जी. रामचंद्रन हे तामिळनाडूचे मुख्यमंत्री बनले. १९८७ साली त्यांचे निधन होईपर्यंत ते मुख्यमंत्री पदावर होते.

अर्थात द्रमुकला हरवणे त्याला वाटते तितके सोपे नाही. त्याच्या पाठीमागे लाखो फॅन्सची फौज आहे. परंतु द्रमुक सारखी मजबूत संघटना त्याच्याकडे नाही. माजी मुख्यमंत्री करुणानिधी यांनी बरेच कष्ट घेऊन द्रमुकची संघटना तळागाळापर्यंत पोहोचवली. अण्णाद्रमुक बरोबर टक्कर देत त्यांनी पक्षाला निरनिराळ्या निवडणुकांत विजय मिळवून दिला.

१९६७ साली अण्णा दुराई यांच्या नेतृत्वाखाली द्रमुक हा पक्ष तामिळनाडूमध्ये पहिल्यांदा सत्तेवर आला.तामिळ अस्मिता आणि हिंदी भाषेला प्रखर विरोध हे मुद्दे हातात घेऊन द्रमुकने कॉंग्रेसचा पराभव केला आणि



**अभय गोखले**

एम.जी.रामचंद्रन हे अतिशय लोकप्रिय अभिनेते होते. तसेच द्रमुक मधून बाहेर पडताना त्यांनी पक्षसंघटनेचा मोठा भाग आपल्या बरोबर नेल्याने, त्यांना निवडणुका जिंकण्यासाठी त्याचा खूप फायदा झाला. सिनेस्टार विजय याची समस्या अशी आहे की तो सिनेसृष्टीतून डायरेक्ट राजकारणात आल्याने त्याच्याकडे संघटनेचा अभाव आहे.

यापुर्वी सिनेस्टार विजयकांत यांनीही विजय याच्याप्रमाणे आपली हवा निर्माण केली होती, परंतु ते द्रमुक आणि अण्णा द्रमुक यांच्या समोर टिकाव धरू शकले नाहीत. कारण त्यांच्याकडेही मजबूत संघटना नव्हती. त्यांनी स्थापन केलेल्या डीएमडीके या पक्षाला विधानसभेच्या २९ जागांवर विजय मिळाला होता आणि ती त्यांच्या पक्षाची सर्वोत्तम कामगिरी होती.

सिनेस्टार कमलहासन यांनीही तामिळनाडूच्या राजकारणात आपले भविष्य आजमावण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी स्थापन केलेल्या पक्षाला राज्यातील मतदारांनी साफ नाकारले.

या पार्श्वभूमीवर विजय यांच्या पक्षाची पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत कशी कामगिरी होऊ शकेल, याबाबत अंदाज बांधता येईल. तामिळनाडूमध्ये सध्या सत्तेवर असलेली द्रमुक प्रणित आघाडी मजबूत अवस्थेत आहे. लोकसभा निवडणुकीत नेत्रदीपक कामगिरी करून, या आघाडीने आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यामुळे विजय याच्यासाठी सामना सोपा नसेल.

त्याशिवाय अण्णा द्रमुक प्रणित आघाडीही निवडणूक रिंगणात असणार आहे.विजयने आपल्या भाषणात द्रमुकवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, तसेच राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थितीबाबत त्याने द्रमुक सरकारवर टीका केली. मात्र राज्यातील जनतेने त्याच्या पक्षाला सत्तेपर्यंत पोहचवले तर तो जनतेकरता काय करणार आहे हे तो व्यवस्थितपणे मांडू शकला नाही.

सिनेस्टार विजयकडे त्याच्या फॅन्सची मोठी फौज असली तरी, त्यामध्ये सुसूत्रता नाही, केवळ उत्साह आहे. मात्र त्याच्या विरोधातील द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे पक्ष कसलेले आहेत, त्यांच्याकडे राजकारणाचा प्रदिर्घ अनुभव आहे, हे लक्षात घेता, पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्याच्या पक्षाची कामगिरी कशी होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

■ ■ ■

# शिक्षक होण्याच्या स्वप्नांचा भंग!

(कालच्या अंकावरून पुढे)

-----------------

आज महाराष्ट्रातील हजारो शिक्षक पदासाठी तरुणांचा प्रश्न एकच आहे,"जागा भरती कधी होणार?" सत्ताधारी पक्षाकडून फक्त घोषणा होत आहेत, पण ठोस पावले उचलली जात नाहीत. परिणामी तरुणाईत तीव्र असंतोष आहे. हा फक्त रोजगाराचा प्रश्न नाही. हा तरुणांच्या भविष्याचा, समाजाच्या संस्कारांचा आणि शिक्षणाच्या गुणवत्तेचा प्रश्न आहे. जर सरकारने तात्काळ जागा भरती केली नाही, तर या तरुणांचा असंतोष लवकरच उग्र रूप धारण करेल. शासनाने शिक्षण क्षेत्रात सुधारणा घडवण्यासाठी ठोस पावले उचलली पाहिजेत. ज्यामुळे तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि शिक्षण क्षेत्र पुन्हा प्रगतीच्या मार्गावर जाईल.

महाराष्ट्रातील शिक्षक भरतीची प्रलंबित प्रक्रिया फक्त एक रोजगाराचा प्रश्न नाही, ती तर तरुणांच्या भवितव्याशी, समाजाच्या संस्कारांशी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेशी थेट निगडीत गंभीर संकट आहे. दोनझअडीच वर्षांपासून सुरू असलेल्या घोषणाबाजीतून स्पष्ट दिसते की शासनाने या समस्येकडे तातडीने आणि ठोस दृष्टीने लक्ष दिलेले नाही.

शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे महाविद्यालयांमध्ये दर्जेदार अध्यापन कमी झाले आहे, विद्यार्थ्यांचे भविष्य अधोरेखितपणे धोक्यात आले आहे. वर्षानुवर्षे मेहनत करून पात्र ठरलेले तरुण मानसिक, सामाजिक आणि आर्थिक असुरक्षिततेच्या अंधारात अडकले आहेत. त्यांच्या स्वप्नांचा चुराडा होत आहे; विवाहाची आणि कौटुंबिक जीवनाची योग्य वेळही अनिश्चिततेमुळे गमावली जात आहे.

सरकारकडे भरतीसाठी आर्थिक साधने असूनही ती चुकीच्या योजना, भव्य जाहिराती आणि प्रचारात्मक मोहिमांवर खर्च केली जात आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 मध्ये शिक्षणासाठी जीडीपीच्या ६ % खर्च करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असले तरी, प्रत्यक्षात त्या दिशेने पावले उचलली जात नाहीत. या विसंगतीमुळे तरुणांचे मनोबल ढासळते आणि समाजातील विश्वासही कमी होतो.

शेवटी असे म्हणायचे का? की, आजची तरुणाई राजकीय मतभेद आणि निर्णय घेण्यात असमर्थता, यामुळे भरती प्रक्रिया ढिलाईची शिकार झाली आहे. सत्तेत असूनही जबाबदारी टाळणे आणि धोरणातील विसंगती हा भार फक्त तरुणांवर येतो.

हजारो पात्र तरुण वर्षानुवर्षे मेहनत करूनही अशाश्वततेच्या अधिवासात अडकले आहेत; त्यांच्या स्वप्नांचा, मेहनतीचे फळ मिळत नाही आहे. या सर्व समस्यांवरून स्पष्ट होते की, शासनाने तातडीने शिक्षक भरती प्रक्रिया सुरळीत करणे, आवश्यक आर्थिक तरतूद करणे आणि शिक्षण क्षेत्रात वास्तविक सुधारणा राबवणे अत्यावश्यक आहे. अन्यथा तरुणाईतील असंतोष उग्र रूप धारण करेल आणि त्याचा परिणाम केवळ शिक्षणावरच नाही तर संपूर्ण समाजाच्या शाश्वत विकासावरही होईल.

२००४-०५ पासून शिक्षकेत्तर कर्मचारी भरती बंद आहे. तब्बल २० वर्षांपासून भरती न झाल्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागातील हजारो पदे रिक्त आहेत. या रिक्त जागांमुळे महाविद्यालयांचे व्यवस्थापन ढासळले आहे, प्राचार्यांना प्रशासन सांभाळण्यास मोठा ताण येतो, विद्यार्थी मार्गदर्शन, ग्रंथालय, प्रयोगशाळा यांसारख्या सुविधा व्यवस्थित चालत नाहीत. तरीही शासन फक्त घोषणांची आतषबाजी करत आहे, प्रत्यक्षात ठोस पावले उचललेली नाहीत.

प्राचार्य आणि शिक्षण व्यवस्थापकांसाठी प्रशासन सांभाळणे कठीण झाले आहे. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो, या दिशेने आपण कुठे चाललो आहोत?

महाराष्ट्राच्या भवितव्यासाठी, तरुणांच्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी, आणि समाजातील ज्ञान-संस्कारांच्या जतनासाठी ही तातडीची वेळ आहे, आता प्रत्यक्ष कृतीची गरज, नाही फक्त घोषणांची गरज.....!

-----------

■ **प्रा. डॉ. प्रशांत विघे**
**सिनेट सदस्य,**
**संत गाडगे बाबा विद्यापीठ, अमरावती**
**९३२६८७७७४९**

■ ■ ■

**अशोकायन**

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



## गणेश वंदना!

प्रथम पुजेचा
मान तुम्हा
अगाध तुमची
त्रिभुवनी किर्ती ..

कार्यारंभी करीता
हृदयस्थ प्रार्थना
विघ्ने सारी हरती
पुर्ण होती मनोकामना ..

बुध्दीची देवता तूम्ही
देईजे मम सद् बुध्दी
कृपादृष्टीने होवो
माझी कार्य सिध्दी .

# प्युअर ईव्ही अमरावती दाखल ईव्ही क्रांतीला नवी चालना



**अमरावती, ३० ऑगस्ट :** भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या प्युअर ईव्ही ने आज अमरावतीमध्ये आपल्या नवीन शोरूमचे भव्य उद्घाटन जाहीर केले आहे. ही रणनीतिक विस्तार योजना दक्षिण भारतात प्युअरची उपस्थिती मजबूत करण्याच्या मिशनमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

हे नवीन शोरूम कोठारा, परतवाडा-बेतुळ रोड, ता. अचलपूर, जि. अमरावती येथे स्थित असून, येथे ईप्लुटो जी मॅक्स, ईट्रिस्ट एक्स यांसारख्या लोकप्रिय इलेक्ट्रिक दुचाकींची संपूर्ण श्रेणी उपलब्ध असणार आहे. अमरावतीतील नागरिकांसाठी प्युअर ईव्ही एक अद्वितीय आणि पर्यावरणपूरक वाहन चालविण्याचा अनुभव घेऊन येत आहे..

या अत्याधुनिक इलेक्ट्रिक स्कूटर्स आणि बाईक्ससोबतच, या शोरूममध्ये प्युअरपॉवर ऊर्जा संचयन उत्पादन श्रेणी देखील सादर केली जाईल, जी घरे आणि व्यवसायांना स्वच्छ आणि विश्वासार्ह ऊर्जा समाधान पुरवेल.

या शोरूमचे उद्घाटन प्युअर ईव्ही च्या आक्रमक विस्तार धोरणाचे प्रतीक आहे, ज्याचा उद्देश भारतभर ईव्ही प्रवेश वाढविणे आणि अधिकाधिक नागरिकांना इलेक्ट्रिक वाहनांच्या उपयोगासाठी प्रेरित करणे आहे. देशी संशोधन व विकास आणि उत्पादनावर भर देत, प्युअर ईव्ही नावीन्याचा पाठपुरावा करत आहे आणि ग्राहकांना शाश्वत पर्याय निवडण्यास सशक्त बनवत आहे.

हा विस्तार प्युअरच्या पुढील ३० महिन्यांत २५० नवीन डीलरशिप्स उभारण्याच्या व्यापक योजनेचा एक भाग आहे, ज्यामुळे देशभरातील प्युअरच्या डीलरशिप्सची संख्या ३२० पेक्षा अधिक होईल. दीर्घ रेंजच्या ईव्हींसाठी वाढती मागणी, आणि अनुकूल धोरणे व जनजागृतीमुळे संस्थात्मक व बी२बी क्षेत्रातील स्वीकृती वाढल्याने ही वाढ शक्य होणार आहे.

अमरावती येथील या नव्या शोरूमद्वारे, प्युअर ईव्ही भारताच्या स्वच्छ गतिशीलता आणि ऊर्जा स्वातंत्र्याकडे संक्रमणाच्या प्रवासात महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.



# सीएटने 'सिक्युराड्राइव्ह सर्कल' कार टायर केले लाँच

**नागपूर, ३० ऑगस्ट :** भारतातील आघाडीची टायर उत्पादक कंपनी असलेल्या सीएटने आज सिक्युराड्राइव्ह सर्कल हा टायर सादर करीत असल्याची घोषणा केली. हा ९० टक्क्यांपर्यंत टिकाऊ (जैव-आधारित) साहित्य वापरण्यात आलेला भारतातील पहिला प्रवासी कार टायर आहे. या टायरच्या माध्यमातून सीएटने शाश्वतता आणि तांत्रिक नेतृत्वाच्या जोरावर प्रीमियम सेगमेंटमध्ये आणखी एक मोठी झेप घेतली आहे. याआधीही सीएटने काल्म तंत्रज्ञान, झेडआर-रेटेड टायर्स आणि रन-फ्लॅट टायर्स यांसारखे अनेक नवोन्मेष बाजारात आणले आहेत. त्यामुळे अत्याधुनिक मोबिलिटी सोल्यूशन्स देण्याच्या कंपनीच्या कटिबद्धतेला बळकटी मिळाली आहे.

हा टायर खासकरून शहरी ग्राहकांसाठी तयार करण्यात आला आहे. विशेषतः २५ ते ४५ वयोगटातील टियर-१ शहरांमध्ये राहणाऱ्या उच्च मध्यमवर्गीय ते संपन्न वर्गातील ग्राहकांना यामध्ये गृहीत धरण्यात आले आहे. हे ग्राहक शाश्वततेकडे केवळ जबाबदारी म्हणून पाहत नाहीत, तर तिला जीवनशैली आणि प्रतिष्ठेचा पर्याय मानतात. अशा ग्राहकांसाठी सिक्युराड्राइव्ह सर्कल हा पर्यावरणीय जागरूकता, सुरक्षितता आणि जागतिक दर्जाची कामगिरी यांचा उत्कृष्ट संगम आहे.

हा टायर सीएटच्या हलोल येथील अत्याधुनिक जागतिक संशोधन व विकास केंद्रात विकसित करण्यात आला आहे. या टायरमध्ये ५० टक्के आणि ९० टक्के टिकाऊ साहित्य असलेली दोन मॉडेल्स आहेत. रोड-टेस्टिंगनंतर बाजारात उतरलेला हा टायर आजवरचा सर्वाधिक टिकाऊ साहित्य असलेला प्रवासी कार टायर ठरला आहे.

हा टायर सादर करतेप्रसंगी सीएट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी अर्णब बनर्जी म्हणाले, शाश्वत मोबिलिटीमध्ये भारत नवे मानदंड प्रस्थापित करू शकतो हे दाखवणारा सिक्युराड्राइव्ह सर्कल हा एक क्रांतिकारी टप्पा आहे. ९० टक्के टिकाऊ साहित्य वापरून पूर्णतः रोड-रेडी टायर तयार करून सीएटने कार्यक्षमता आणि पर्यावरणपूरक नवकल्पना यांची नव्याने व्याख्या केली आहे, तसेच प्रीमियम आणि भविष्याभिमुख ब्रँड होण्याच्या आमच्या प्रवासाला गती दिली आहे. शाश्वतता हा आता पर्याय राहिलेला नाही, तर ती एक जबाबदारी झाली आहे. सिक्युराड्राइव्ह सर्कल टायर सादर करून आम्ही हरित वाहतुकीमध्ये संक्रमण करण्यामध्ये आमचे नेतृत्व सिद्ध केले आहे.

# जेबीएलने नवीन ऑडिओ लाइनअप आणि ३६० डिग्री मार्केटिंग मोहिमेसह सणासुदीचा उत्साह वाढवला

**नागपूर, ३० ऑगस्ट :** भारतात बहुप्रतिक्षित सणासुदीचा हंगाम सुरू होत असताना, जेबीएल इंडियाने आपली ३६०-डिग्री मार्केटिंग मोहीम - साउंड ऑफ सेलिब्रेशन्स सादर केली आहे. या मोहिमेत प्रादेशिक संगीताचा आनंद साजरा करणारे एक खास गाणे आणि दमदार नवीन उत्पादनांची श्रेणी सादर केली आहे, ज्यात जेबीएल पार्टीबॉक्स एन्कोर २, पार्टीबॉक्स एन्कोर इसेन्शियल २, पार्टीबॉक्स ५२०, चार्ज ६, फ्लिप ७, आणि जेबीएल बार १३०० यांचा समावेश आहे. ही उत्पादने रिटेल, डिजिटल आणि सांस्कृतिक स्तरांवर आवाज, भावना आणि नवनिर्मिती यांचे मिश्रण घडवून आणतात.

डिजिटल मार्केटिंग मोहीम -साउंड ऑफ सेलिब्रेशन्स : या सणासुदीच्या हंगामासाठी जेबीएल इंडियाने साउंड ऑफ सेलिब्रेशन्स हे खास गाणे डिजिटल मोहिमेद्वारे सादर केले आहे. हे गाणे भारतातील विविध सणांतील वैशिष्ट्यपूर्ण आवाज टिपते. गणेश चतुर्थीच्या ढोलांच्या गजरापासून, दुर्गा पूजेतील ढाकच्या तालापर्यंत आणि ओणमच्या उत्साही चेंडा वाद्यापर्यंत, प्रत्येक प्रदेशातील संगीत एकात्मतेच्या भावनेला कसा हातभार लावते हे हे गाणे अधोरेखित करते. हे गाणे प्रसिद्ध संगितकार सेज अन द बिट यांनी संगीतबद्ध केले आहे. यात देशभरातील कलाकारांचा सहभाग आहे- एमसी कूपर (केरळ/ओणम), एमसी गावठी (महाराष्ट्र/गणेश चतुर्थी), संजिता भट्टाचार्य (पश्चिम बंगाल/दुर्गा पूजा) आणि श्रेया जैन. हे गाणे यूट्यूबवर प्रदर्शित झाले असून, जेबीएलच्या सोशल मीडिया चॅनेल्सवरही प्रसारित केले आहे.

सणासुदीच्या हंगामात नवीन उत्पादने: हा सणासुदीचा हंगाम अधिक खास करण्यासाठी जेबीएल आपल्या पोर्टफोलिओमध्ये नवी ऊर्जा आणत आहे. कंपनीने जेबीएल पार्टीबॉक्स एन्कोर २, पार्टीबॉक्स एन्कोर इसेन्शियल २ आणि पार्टीबॉक्स ५२० ही उत्पादने लाँच केली आहेत. ही उत्पादने खास संगीतप्रेमी आणि पार्टीप्रेमींसाठी डिझाइन केली असून, त्यात दमदार आवाज, सहज पोर्टेबिलिटी आणि आकर्षक लाइटिंग इफेक्ट्सची सुविधा आहे. सप्टेंबरमध्ये वायरलेस स्पीकर चाहत्यांसाठी जेबीएल चार्ज ६ आणि फ्लिप ७ हे कॉम्पॅक्ट ऑडिओ स्पीकर्स सप्टेंबरमध्ये बाजारात उपलब्ध होणार आहेत. घरगुती मनोरंजनासाठी, कंपनी जेबीएल बार १३०० सादर करत आहे, जो कुटुंबाच्या एकत्र येण्याच्या क्षणांना थेट घरबसल्या सिनेमॅटिक सराउंड साउंडचा अनुभव देईल.

जेबीएल हे नेहमीच केवळ फक्त ध्वनीपुरते मर्यादित नाही - ते भारताच्या उत्सवांचा एक भाग आहे, असे हार्मन इंडियाचे इंटिग्रेटेड मार्केटिंग संचालक, योगेश नांबियार यांनी सांगितले. या सणासुदीच्या हंगामात, घरात होणाऱ्या कार्यक्रमांपासून ते रोड ट्रिप्स किंवा सांस्कृतिक उत्सवांपर्यंत, आवाज, संस्कृती आणि भावना यांचा मिलाफ साधणाऱ्या उत्पादनांसह आणि अनुभवांसह प्रत्येक ठिकाणी उपस्थित राहणे हे आमचे उद्दिष्ट आहे.

ते पुढे म्हणाले, जेबीएल या सणासुदीचा हंगाम पूर्वीपेक्षा अधिक उत्साही, तेजस्वी आणि संस्मरणीय बनवण्याचा विचार करत आहे. यासाठी नवीन पोर्टफोलिओ,



वाढलेली रिटेल पोहोच आणि ओणम, गणेश चतुर्थी, दुर्गा पूजा आणि दिवाळीच्या भावनांचा उत्सव साजरा करणाऱ्या मोहिमेचे संयोजन केले जाईल. जेबीएलची 'फर्स्ट डजन्ट फॉलो' ही मोहीम जुलैमध्ये सुरू करण्यात आली होती, जी उत्पादन-केंद्रित दृष्टिकोनातून भावना-आधारित कथांकडे एक रचनात्मक बदल दर्शवते. आयुष्यातील महत्त्वाच्या 'पहिल्या' क्षणांमध्ये संगीताची भूमिका साजरी करणारी ही मोहीम सणासुदीच्या हंगामातही सुरूच राहील, ज्यामुळे जेबीएलच्या व्यापक सणासुदीच्या धोरणाला अधिक खोली आणि भावना प्राप्त होतील.

# गुडघा, कंबर आणि खांद्याच्या शस्त्रक्रियेमधील प्रगतीमुळे सर्व वयोगटातील रुग्णांची हालचाल पुन्हा सुधारते



**नागपूर, ३० ऑगस्ट :** सांध्यांचा त्रास हा वयोमानानुसार होणाऱ्या सर्वात सामान्य समस्यांपैकी एक आहे. पूर्वीच्या पिढीतील अनेक वृद्ध लोक हा त्रास सहन करून डॉक्टरांकडे जाण्यास उशीर करत असत, पण आजचे सक्रिय प्रौढ व्यक्तीं संपूर्ण जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेमुळे दीर्घकाळाचा आराम मिळवत आहेत. वय वाढल्यावर सांध्यांचा झीज होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे, ज्यामुळे वेदना आणि त्रास होतो. आर्थ्रायटिसचा सर्वात सामान्य प्रकार म्हणजे ऑस्टिओआर्थ्रायटिस, भारतातील वृद्ध लोकांमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतो. यात हाडांच्या टोकांवर असलेले संरक्षणात्मक कार्टिलेज हळूहळू झिजते, ज्यामुळे हाडे एकमेकांवर घासली जातात आणि यातून तीव्र वेदना होतात. यामुळे चालणे-फिरणे खूप कमी होते आणि जीवनमानावर नकारात्मक परिणाम होतो.

ऑस्टिओआर्थ्रायटिस शरीरातील कोणत्याही सांध्याला होऊ शकतो, पण वजन पेलणारे सांधे जसे की कंबर आणि गुडघे यामध्ये तो सर्वाधिक दिसतो आणि वेदनादायक ठरतो. जे लोक सततच्या वेदनांनी त्रस्त असतात, विश्रांतीत किंवा रात्रीसुद्धा त्रास होतो, किंवा हालचाल खूपच कमी झाली आहे, अशा रुग्णांना पुन्हा चालणे-फिरणे आणि स्वावलंबी होण्यासाठी शेवटी शस्त्रक्रियेची गरज भासू शकते.

आधुनिक उपचार पद्धती: वेदना कमी करण्यापासून शस्त्रक्रियेपर्यंत

जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रियेचा मुख्य उद्देश म्हणजे खराब झालेले सांध्याचे भाग काढून त्याऐवजी मेटल, प्लास्टिक, पॉलीइथिलीन, सिरॅमिक किंवा यांचे मिश्रण अशा कृत्रिम साहित्याचा वापर करून नवीन सांधा बसवणे हा आहे. वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आता पूर्वीपेक्षा अधिक प्रकारचे कृत्रिम सांधे उपलब्ध झाले आहेत, ज्यामुळे ऑर्थोपेडिक सर्जन प्रत्येक रुग्णाच्या गरजेनुसार सर्वात योग्य पर्याय निवडू शकतात.

मिनिमली इनवेसिव्ह शस्त्रक्रिया पद्धती, जसे की सबव्हास्टस ॲप्रोच गुडघा प्रत्यारोपणामध्ये, रुग्णांना लवकर बरे होण्यास मदत करतात, कमी दिवस रुग्णालयात राहावे लागते आणि वेदनाही कमी होतात. महत्वाचे म्हणजे, यासाठी वयाची मर्यादा नाही. बहुतांश रुग्ण ५० ते ८० वयोगटातील असतात, पण शस्त्रक्रियेची योग्यता फक्त वयानुसार ठरत नाही, तर रुग्णाच्या एकूण आरोग्यावर अवलंबून असते. शस्त्रक्रियेसाठी आधीपासून वजन कमी करणे, काही व्यायाम आणि घरातील वातावरणात आवश्यक ते बदल केल्यास शस्त्रक्रियेनंतरची बरे होण्याची प्रक्रिया आणखी सोपी आणि जलद होते.

लवकर उपचार का महत्त्वाचे आहेत

जॉइंट रिप्लेसमेंट ही आधुनिक वैद्यकशास्त्रातील सर्वात यशस्वी शस्त्रक्रियांपैकी एक मानली जाते. गुडघा आणि कंबर प्रत्यारोपणामुळे हालचाल पुन्हा सुधारते, वेदना कमी होतात आणि जीवनमानात मोठा बदल होतो. अनेक रुग्ण शस्त्रक्रियेनंतर केवळ दुसऱ्या दिवशीच स्वतंत्रपणे स्वतःहून चालू शकतात. खांदा आणि कोपर प्रत्यारोपण, जे पूर्वी टाळले जात होते, आता मागील दोन दशकातील शस्त्रक्रियेतील प्रगतीमुळे विश्वसनीय आणि कार्यक्षम परिणाम देत आहेत.

बहुतेक इम्प्लांट्स किमान १० ते १५ वर्षे टिकतात, आणि अनेक वेळा त्याहूनही जास्त काळ टिकतात. शस्त्रक्रियेनंतर हालचालीत आणि आरामात झालेल्या मोठ्या बदलामुळे अनेक रुग्णांना उशीराने शस्त्रक्रिया केल्याचे दुःख वाटते.

जॉइंट केअरमध्ये नवे पर्व

सुधारलेल्या आरोग्य सुविधा, अधिक चांगले इम्प्लांट डिझाईन, प्रगत ॲनेस्थेसिया पद्धती आणि वेदना नियंत्रणातील सुधारणा यामुळे जॉइंट रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया ही आर्थ्रायटिसने त्रस्त असलेल्या लोकांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि जीवन बदलणारा पर्याय ठरली आहे. रुग्णांची जागरूकता आणि वेळेवर केलेला उपचार हे वेदनामुक्त जीवन जगण्यासाठी आणि दैनंदिन कामांमध्ये स्वावलंबी राहण्यासाठी सर्वात महत्त्वाचे घटक आहेत.

# एनएक्सट्रा ने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एअरटेल द्वारे प्रसिद्ध केलेला शाश्वतता अहवाल

**मुंबई, ३० ऑगस्ट:** भारती एअरटेलची उपकंपनी असलेली एनएक्सट्रा डेटा लिमिटेड (एनएक्सट्रा एअरटेल ), गुरगाव (भारत) ह्यांनी त्यांचा २०२४-२५ चा शाश्वतता अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामध्ये कंपनीनं स्मार्ट, मोठ्या प्रमाणात वापरता येईल अशी आणि टिकाऊ डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर तयार करण्याबाबत झालेली प्रगती सांगितली आहे. हा अहवाल शाश्वततेच्या तीन स्तंभांमध्ये एनएक्सट्रा ची वचनबद्धता आणि प्रगती अधोरेखित करतो - स्वच्छ ऊर्जा आणि स्मार्ट ऑपरेशन्सद्वारे पर्यावरणीय प्रभाव कमी करणे, सामाजिक समावेश आणि सुरक्षितता वाढवणे आणि पारदर्शकता आणि जबाबदारीसह प्रशासनाला बळकटी देणे.

सीईओ, ॲशिष अरोरा यांनी सांगितले: एनएक्सट्रा मध्ये शाश्वतता हा आमच्या प्रत्येक कामाचा केंद्रबिंदू आहे मग तो डिझाईन असो, कन्स्ट्रक्शन असो किंवा ऑपरेशन्स. या वर्षी आम्ही इंडस्ट्रीसाठी नवे बेंचमार्क तयार केले आहेत. आम्ही देशातले पहिले डेटा सेंटर आणि फक्त १४वी कंपनी आहोत ज्यांनी आरई१०० जागतिक उपक्रमात प्रवेश केला आणि १००% पुनर्नवीनीकरणीय उर्जेचा वापर करण्याची वचनबद्धता दिली. तसेच आम्ही देशातले पहिले आहोत ज्यांनी एआयचा मोठ्या प्रमाणावर वापर करून उर्जा कार्यक्षमता वाढवली आणि कार्यप्रदर्शन सुधारले.

# अदाणी स्किल्स अँड एज्युकेशन ने लाँच केला कर्म शिक्षा एनसीव्हीईटी मान्यताप्राप्त अग्रगण्य वर्क-स्टडी डिप्लोमा प्रोग्रॅम

**अहमदाबाद, ३० ऑगस्ट :** अदाणी ग्रुपच्या कौशल्य विकास विभाग अदाणी स्किल्स अँड एज्युकेशन (एएसई) ने आज कर्म शिक्षा या अभिनव वर्क-स्टडी डिप्लोमा प्रोग्रॅमची घोषणा केली.हा प्रोग्रॅम नॅशनल कौन्सिल फॉर व्होकेशनल एज्युकेशन अँड ट्रेनिंग (एनसीव्हीईटी), कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (एमएसडीई) यांच्याकडून मान्यता प्राप्त आहे.

कर्म शिक्षा हा प्रोग्रॅम दहावी व बारावी उत्तीर्ण (सर्व शाखा) तसेच आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांना उद्योगाशी जोडलेले, रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी तयार करण्यात आला आहे.यात वर्गातील शिक्षणासोबत अदाणी समूहाच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये पोर्ट्स, पॉवर, सोलर मॅन्युफॅक्चरिंग, ग्रीन एनर्जी आणि लॉजिस्टिक्स प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळेल.

या प्रसंगी अदाणी समूहाचे अध्यक्ष श्री. गौतम अदाणी म्हणाले,कर्म शिक्षाद्वारे आम्ही विद्यार्थ्यांना केवळ शिक्षणच नव्हे, तर व्यावहारिक कौशल्ये देत आहोत जी त्यांच्या संधींचे नवे दरवाजे उघडतील. हे आमच्या हम करके दिखाते हैं या तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे विचार कृतीत आणणे, दृष्टी वास्तवात आणणे आणि तरुण पिढीला विकसित भारत घडवण्यात सक्षम करणे.

# मॅक्स हॉस्पिटल, नागपूरने गाठला १०० रोबोटिक शस्त्रक्रियांचा टप्पा, नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल

**नागपूर, ३० ऑगस्ट :** मॅक्स सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल, नागपूरने आज आपल्या सर्जिकल प्रोग्राम मध्ये एक महत्त्वाचा टप्पा गाठल्याची घोषणा केली. हॉस्पिटलने १०० हून अधिक रोबोटिक-असिस्टेड शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्या असून, त्यामुळे ते या भागातील अत्याधुनिक आणि मिनिमली इनवेसिव्ह उपचार करणाऱ्या अग्रगण्य केंद्रांपैकी एक ठरले आहे.

हा महत्त्वाचा टप्पा हॉस्पिटलच्या अत्याधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे शस्त्रक्रियेत अचूकता वाढते, रुग्णांचे आरोग्य सुधारतात आणि बरे होण्याचा कालावधी कमी होतो. दा विंची या अत्याधुनिक सिस्टीमवर आधारित रोबोटिक शस्त्रक्रियेच्या मदतीने डॉक्टरांना विशेषतः गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अतिशय अचूकतेने, लवचिकतेने आणि नियंत्रणासह शस्त्रक्रिया करता येते.

या यशाबद्दल बोलताना डॉ. अभिनव देशपांडे, डायरेक्टर सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक ऑंकोसर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, शस्त्रक्रियेत रोबोटिक्सचा वापर हा खूप मोठा बदल ठरला आहे. यामुळे आम्हाला गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अधिक नियंत्रण आणि अचूकतेने करता येतात, ज्यामुळे रुग्णांना अधिक सुरक्षितता आणि चांगले परिणाम मिळतात.

डॉ. राजविलास नरखेडे, प्रिन्सिपल कन्सल्टंट सर्जिकल गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, लिव्हर ट्रान्सप्लांट आणि बिलियरी सर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, १०० शस्त्रक्रियांचा टप्पा गाठणे हे फक्त आकडेवारी नाही, तर रुग्णांचे जीवन बदलण्याचा प्रयत्न आहे. रोबोटिक शस्त्रक्रियेच्या सहाय्यामुळे आम्ही गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया लहान चिरांद्वारे करू शकलो, ज्यामुळे रुग्णांना कमी वेदना झाल्या, लवकर बरे होणे आणि हॉस्पिटलमध्ये कमी दिवस राहणे शक्य झाले.

डॉ. जुनैद शेख, प्रिन्सिपल कन्सल्टंट युरोलॉजी आणि किडनी ट्रान्सप्लांट सर्जरी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाले, युरोलॉजी आणि ट्रान्सप्लांट उपचारांमध्ये रोबोटिक असिस्टेड शस्त्रक्रिया एक मोठा बदल घडवून आणत आहे. रोबोटिक हात ३६० अंशांपर्यंत फिरू शकतात, ज्यामुळे डॉक्टरांना अतिशय गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अत्यंत अचूकतेने करता येतात. पारंपरिक शस्त्रक्रियेच्या तुलनेत रुग्णांना खूप लवकर त्यांच्या दैनंदिन जीवनात परतता येते.

डॉ. साक्षी बंसल, सीनियर कन्सल्टंट ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजी, मॅक्स हॉस्पिटल, नागपूर म्हणाल्या, रोबोटिक असिस्टेड शस्त्रक्रिया केवळ डॉक्टरांसाठीच फायदेशीर नाही, तर रुग्णांच्या उपचारांमध्येही मोठा फरक घडवते. यामुळे रुग्ण लवकर बरे होतात आणि गुंतागुंतीचा धोका कमी होतो. तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत, रोबोटिक शस्त्रक्रिया भारतभरातील आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनणार आहेत. हे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया सर्जन आणि रूग्ण दोघांसाठी अधिक सोप्या, सुरक्षित आणि कार्यक्षम कशा बनू शकतात याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

हॉस्पिटलने युरोलॉजी, ऑंकोलॉजी, गायनॅकोलॉजी आणि जनरल सर्जरी अशा विविध क्षेत्रांत रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे.

या यशामुळे मॅक्स सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल, नागपूरने प्रगत शस्त्रक्रियेसाठी विश्वासार्ह ठिकाण म्हणून आपली ओळख आणखी मजबूत केली असून रुग्णांची सुरक्षितता, उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा आणि नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची आपली वचनबद्धता पुन्हा अधोरेखित केली आहे.

# कायनेटिक वॉट्स अँड व्होल्ट्सने आपल्या प्रसिद्ध डीएक्सला एका संपूर्ण नव्या इलेक्ट्रिक अवतारात पुनरुज्जीवित केले

**दिल्ली, ३० ऑगस्ट :** कायनेटिक इंजिनियरिंग लिमिटेड ने संपूर्ण नवीन कायनेटिक डीएक्स ईव्ही च्या लॉन्चसह दुचाकी बाजारात आपल्या पुनरागमनाची घोषणा केली आहे. ही नवीन मेड-इन-इंडिया मॉडेल श्रेणी कायनेटिक वॉट्स अँड व्होल्ट्स लि. या त्यांच्या ईव्ही उत्पादनास समर्पित कंपनीद्वारे तयार करण्यात आली आहे. नाविन्यपूर्णता, व्यावहारिकता आणि उत्कृष्ट रूप असलेली, अनेक पिढ्यांनी वाखाणलेली डीएक्स आता एका प्रगत इलेक्ट्रिक स्कूटरच्या रूपात पुनरागमन करत आहे, ज्यामध्ये त्यांचे लोकप्रिय डिझाईन आणि आधुनिक टेक्नॉलॉजीचा सुमेळ साधण्यात आला आहे, जे डीएक्स च्या वृत्तीस अनुरूप आहे. या स्कूटरचा मूळ डीएनए अबाधित ठेवण्यासाठी इटालियन डिझाईर्सच्या सोबतीने आकर्षक डिझाईन तयार करण्यात आले आहे. त्यामुळे हे एक खरेखुरे कौटुंबिक वाहन बनले आहे.

डीएक्स ईव्हीच्या मागील व्हिजनविषयी बोलताना कायनेटिक इंडियाचे उपाध्यक्ष श्री. अजिंक्य फिरोदिया म्हणाले, ९०च्या दशकात कायनेटिक डीएक्स ने इतक्या नवीन गोष्टी दिल्या होत्या, की त्या गाडीने लक्षावधी लोकांच्या मनात कायमी स्थान मिळवले. ह्या प्रसिद्ध गाडीचे पुनरुज्जीवन करताना आम्ही केवळ एक स्कूटर लॉन्च केलेली नाही, तर ती विश्वासार्हता, नावीन्यपूर्णता आणि मजबुती देखील पुन्हा सादर केली आहे, जी पूर्वीपासून कायनेटिकची ओळख आहे. मात्र यावेळी त्यात एक भविष्य-उन्मुख चैतन्य आहे. नवीन डीएक्स च्या माध्यमातून आम्ही अनेक सेगमेन्ट-फर्स्ट फीचर्स दाखल केली आहेत आणि आम्हाला खात्री आहे की, ही फीचर्स इलेक्ट्रिक मोबिलिटीच्या नवीन युगात या गाडीला लोकप्रिय बनवतील. कायनेटिकसाठी आणि भारतातील इलेक्ट्रिक गतीशीलतेच्या उत्क्रांतीत ही एका धाडसी नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

# सॅमसंगने सणांपूर्वी लाँच केला बिस्पोक एआय वॉशर ड्रायर, आता कपडे धुणे आणि वाळवणे होईल आणखी सोपे



**मुंबई, ३० ऑगस्ट :** भारतातील सर्वात मोठा कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंग आपल्या प्रीमियम होम अप्लायन्सेसची रेंज आणखी मजबूत करण्यास सज्ज आहे. कंपनी लवकरच मेड इन इंडिया बिस्पोक एआय वॉशर ड्रायर कॉम्बो लाँच करणार असून, तो खासकरून आधुनिक भारतीय घरांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आला आहे.

सणासुदीच्या आधी येणारा हा नवीनवॉशर ड्रायर कॉम्बो त्या भारतीय ग्राहकांसाठी खास आहे, जे डिझाइन, टेक्नॉलॉजी आणि सोयीस्कर वापर यांचा उत्तम संगम शोधत आहेत. या लाँचमुळे सॅमसंग वेगाने वाढणाऱ्या वॉशर-ड्रायर सेगमेंटमध्ये आपली पकड आणखी मजबूत करेल.

नवीन बिस्पोक एआय वॉशर ड्रायर कॉम्बोमध्ये इंटेलिजंट इनोव्हेशन, सिग्नेचर बिस्पोक डिझाइन आणि ॲडव्हान्स्ड फॅब्रिक केअर यांचे परिपूर्ण मिश्रण आहे. यात असलेले एआय वॉश कपड्यांचे वजन, फॅब्रिकचा प्रकार आणि घाण ओळखून प्रत्येक वॉश अधिक प्रभावी बनवते. तर एआय इकोबबल हट्टी डाग सहज काढतो आणि सुपर स्पीड + क्विकड्राइव्ह काही मिनिटांतच कपडे धुणे पूर्ण करतो.

सॅमसंगच्या अलीकडील ग्राहक अभ्यासानुसार, भारतात वॉशर-ड्रायर कॉम्बोची मागणी झपाट्याने वाढत आहे. जागा वाचवण्याची गरज, तसेच एआय-सक्षम, ऊर्जा-बचत करणारी आणि मल्टीफंक्शनल उपकरणांची वाढती लोकप्रियता ही मागणी वाढण्याचे मुख्य कारणे आहे.

या नव्या लाँचसह, सॅमसंगने भारतीय ग्राहकांसाठी एक आधुनिक आणि स्मार्ट उपाय दिला आहे, जो रोजची कपडे धुण्याची प्रक्रिया सोपी आणि त्रासमुक्त करेल आणि घरातील जागाही वाचवेल.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस खूप धावपळीचा असेल. प्रवासात तुम्हाला काही महत्त्वाची माहिती मिळेल. तुमच्या जुन्या चुकांमधून शिका. खूप दिवसांनी जुन्या मित्राला भेटून तुम्हाला आनंद होईल.

**वृषभ :** आजचा दिवस आनंदाचा असेल. जर तुम्ही तुमच्या कामाचे नियोजन करून काम केले, तर ते चांगले राहील. तुम्हाला आनंदाच्या बातम्या मिळतील. नोकरीत प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** सहकाजयाशी बोलताना काळजी घ्या. प्रवासात तुम्हाला काही महत्त्वाची माहिती मिळेल. तुमच्या जबाबदाजयांपासून दूर जाऊ नका. नोकरीत दुसरी चांगली संधी मिळू शकते.

**कर्क :** आज पैशांच्या व्यवहारात घाई करु नये. व्यवसायात विचारपूर्वकच पैसे गुंतवा, कारण कोणताही धोका घेणे हानिकारक ठरू शकते. घराची दुरुस्ती किंवा रंगकाम करण्याचा विचार कराल.

**सिंह :** विद्यार्थ्यांना अभ्यासातील तणावातून आराम मिळेल, सरकारी नोकरीची तयारी करणाजयांनी मेहनत सुरू ठेवावी. तुम्ही तुमच्या आईशी मनातील गोष्टींबद्दल बोलू शकता. मन प्रसन्न ठेवा.

**कन्या :** तुम्ही कोणत्याही योजनेत पैसे गुंतवले, तर ते बुडू शकतात. कोणतेही निर्णय विचारपूर्वक घ्या, नाहीतर नंतर पश्चात्ताप होईल. गाडी अचानक खराब झाल्यामुळे तुमचा खर्च वाढू शकतो.

**तूळ :** कौटुंबिक समस्या दूर होईल. तुमचे बॉस तुमच्या कामावर खूप खुश असतील. तुम्ही तुमच्या कुटुंबासाठी एखादी सरप्राईज पार्टी ठेवू शकता. वाहन चालवताना काळजी घ्या.

**वृश्चिक :** आजचा दिवस काही अडचणी घेऊन येईल, कारण तुमच्या कामात अडथळे येऊ शकतात. एखादे काम बिघडू शकते. नोकरीत तुम्हाला काही नवीन विरोधक मिळू शकतात.

**धनु :** आजचा दिवस आनंदाचा आहे. आजाराकडे दुर्लक्ष करू नका. खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा. आर्थिक गुंतवणूक केली असल्यास तुम्हाला मोठ्या प्रमाणात लाभ संभवतो.

**मकर :** जर तुमच्या मुलांना अभ्यासात काही समस्या येत असतील, तर तुम्हाला त्यांच्या शिक्षकांशी बोलणे आवश्यक आहे. कोणत्याही नवीन कामात विचारपूर्वकच हात घाला.

**कुंभ :** आजचा दिवस अडचणींनी भरलेला असेल. कामांमध्ये तुम्हाला तणाव जाणवेल. कारण व्यवसायात फायदा न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल. तुमच्या भावंडांसोबत तुमचे संबंध सुधारतील.

**मीन :** तुमच्या वडिलांचा जुना आजार पुन्हा सुरू होऊ शकतो, ज्यामुळे तुम्हाला काळजी वाटेल. व्यवसायात नफा होईल. मित्र आणि सहकारी यांच्याकडून मदत मिळेल.

## शब्दकोडे क्रमांक २२०६



**आडवे शब्द :-**


१) पुष्कळ
३) उणीव
८) इमारतीचा मूळ आधार
९) बेचव
१०) लोकांचे विचार
१२) निमंत्रणा
१४) रंगविलेले
१६) सटरफटर, किरकोळ सामान
१८) एक मिश्र धातू
१९) सहाय्य
२०) टरफल
२१) लक्ष्मी
२२) चित्त, लक्ष
२३) तलवारीचे घर
२४) गेरू
२६) ठोसा, घाव
२८) कर्णेंद्रिय
२९) घराचा मागचा दरवाजा
३१) पातक
३२) धनुष्यबाण
३५) कोवळे गवत
३७) मृत्युदेवता
३८) रम्य
४०) पत्नी
४२) आश्रय
४४) मीठ
४५) नगरवासी
४८) मान्यता
४९) हिस्सा
५०) धातूची तार काढणारा
५२) फायदा, प्राप्ती
५३) मदत करणारा
५६) शक्यता असलेला
५९) नंतर
६०) माफ
६३) भटक्या माणूस
६६) बाजेची सुती पट्टी
६८) कुबेराचा सेवक
७०) ** दमयंती
७१) कवितेतील एक शब्दालंकार
७२) एक आंबट तुरट चवीचे औषधी फळ
७३) जिनसांची यादी
७४) दुःखित

**उभे शब्द :-**

२) दात घासण्याचे चूर्ण
३) बशीचा जोडीदार
४) मध
५) चांदी
६) वडील
७) धोका
८) लेंगा
९) उत्सव
११) टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
१३) त्रासलेला
१५) कवी
१७) छोटा
१९) अंतःकरण
२२) नरेंद्र मोदी यांचा पक्ष
२३) ब्रह्मदेशाचे नवीन नाव
२५) वस्त्र, कापड
२७) पोटविभाग
२८) कावळा
३०) दरवाजा
३३) दारूचा एक प्रकार
३४) वंदन
३६) अत्यंत तिखट मसालेभात
३९) शक्यतेप्रमाणे
४१) काम आटोपणे
४३) सीतापती
४६) मगज
४७) सत्वांश
५०) शत्रू
५२) हितावह, प्राप्ती करून देणारा
५४) विजयादशमी
५५) सर्वत्र
५७) पाणी
५८) संगीतातील एक राग
६१) मनुष्य
६२) लोणच्यातील द्रव मसाला
६४) टाळूच्या सहाय्याने निघणारा आवाज उदा. ट, ठ, ण
६५) मृत
६७) खस
६९) माफ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# उच्च शिक्षणाचा लाभ समाजासाठी व्हावा : आ.रणधीर सावरकर

**अकोला :** भारतीय जनता पक्ष अकोला कार्यालयात गणेशोत्सवाच्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये अब्रॉड शिक्षणासाठी कझाकिस्तान, युक्रेन, रशिया या देशांमध्ये जाणाऱ्या ग्रामीण भागातील ५५ विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत, राष्ट्रनिर्मितीसाठी उच्च शिक्षणाचा उपयोग करण्याचे आवाहन भाजपा प्रदेश सरचिटणीस व आमदार रणधीर सावरकर यांनी केले. आई-वडिलांच्या संस्कारातून राष्ट्रभक्ती आणि समाजहित जागवावे. शिक्षणाचा फायदा केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता, समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचवावा, असे मत त्यांनी मांडले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पुस्तकांचा संच, एप्रोन, स्टेटेथोस्कोप आणि सन्मानचिन्ह देण्यात आले. भाजपा कार्यालयात गणपतीची स्थापना करण्यात आली असून, या कार्यक्रमाचा भाग म्हणूनच सदिच्छा प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्ष जयंत मसणे होते. तर मंचावर खासदार अनुप धोत्रे, डॉ. किशोर मालोकार, विजय अग्रवाल, पवन महल्ले, संतोष शिवरकर, गिरीश जोशी, माधव मानकर, डॉ. तात्विक तुरखडे, डॉ. सुप्रित कराळे (उडान एव्हींशलह), डॉ. पवन सावरकर (प्रेरणा हॉस्पिटल तेल्हारा), शांतीकुमार सावरकर, संघर्ष सावरकर, प्रयत्न कराळे, अविनाश दाळु, देवेंद्र तुरखडे, ॲड. देवाशिष काकड, चंदाताई शर्मा, सुमनताई गावंडे, संजय गोटफफोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# हिवरखेड पोलीसांनी ६ गोवंशाना दिले जिवनदान

## चार चाकी बोलेरो पिकअप गाडी जप्त करून आरोपीस केले अटक

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्यामध्ये अवैध्य धंदयाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन प्रहार गोहिम राबविण्यात आली.

पोलीस स्टेशन हिवरखेड येथे दिनांक ३०.०८.२०२५ रोजी रात्री दरम्यान फिर्यादी पोहेकॉ प्रमोद चव्हाण व. न. १९१७ पोलीस स्टेशन हिवरखेड जि. अकोला यांना गुप्त बातमी दारामार्फत खबर मिळाली की, रात्री दरम्यान धोंडा आखर गावाकडुन कडुन अडगाव बु कडे आरोपी हे काही गोवंश जातीचे जनावरे कत्तलीकरीता बोलेरो चारचाकी वाहानामध्ये घेवुन जात आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन फिर्यादी व पोस्टाफ यांनी नाकाबंदी केली असता यातील आरोपी नामे नदीम खान उर्फ



राजा दस्तगीर खान वय ४० वर्ष रा. अडगाव बु हा चारचाकी बोलेरो पिकअप मालवाहू वाहन क्रमांक एम. एच.२७.बि.डी.२२७८ मध्ये एकुण ०६ गोवंश जातीचे जनावरे कोंबुन कत्तलीकरीता घेवुन जातांना मिळुन आल्याने एकुण ०६ गोवंश जातीचे जनावरे किंमत १,१०,०००/- रू तसेच वाहन क्रमांक एम.एच.२७.बि.डी. २२७८ किंमत ६,५०,०००/- रू असा एकुण ७,७०,०००/- रपयाचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला व गोवंश जातीचे जनावरे सुरक्षा व देखभाल कामी गौरक्षण संस्था अकोट येथे रवाना करण्यात आले. फिर्यादी पोहेकॉ प्रमोद चव्हाण ब.न. १९१७ पोलीस स्टेशन हिवरखेड यांनी दिलेल्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन हिवरखेड जि. अकोला येथे अपराध क्रमांक २४४/२०२५ कलम ५, ५ (अ), ९, ९ (अ) प्राणी संरक्षण अधिनियम सहकलम ११ प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करुन तपासात घेतला.

# बार्शीटाकळी येथे निघाला रूट मार्च

**बार्शीटाकळी:** गणपती, ईद मिलादुन्नबी सण असून बार्शीटाकळी येथे ठाणेदार धुमाळे यांच्या पुढाकाराने रूट मार्च काढण्यात आला. मिनार मशीद, बाजार, तसेच कान्हेरी सरप येथे लोकांना सण उत्सव काळात शांततेचे आवाहन करण्यात आले. या काळात कोणतीही अप्रिय घटना घडू नये त्याकरिता हिंदू- मुस्लीम सर्व लोकांची शांतता कमिटीची मीटिंग घेण्यात आली आहे.

ठाणेदार यांनी शांतता कमिटी मध्ये सण उत्साह हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन साजरे करावे. याकरिता लोकांना आवाहन केले. गणपती विसर्जन शांततेत पार पाडावे व ईद मिलादुन्नबी शांततेत करावी असे आवाहन देखील लोकांना केले.

# पितृपक्षाच्या पहिल्याच दिवशी चंद्रग्रहण

## अकोला पुरोहित संघाने दिल्या श्राद्धविधीच्या मार्गदर्शक सूचना

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : येत्या ७ सप्टेंबर रोजी (रविवार) पितृपक्षाच्या पूर्णिमा तिथीला संपूर्ण भारतात पूर्ण चंद्रग्रहण होणार असून, या पार्श्वभूमीवर श्राद्धविधीविषयी स्पष्टता आणण्यासाठी अकोला पुरोहित संघाची विशेष बैठक सिटी कोतवालीच्या मागे असलेल्या बालाजी मंदिरात पार पडली. महाराष्ट्रीयन पंचांगानुसार हे खग्रास चंद्रग्रहण रात्री ९:५७ वाजता सुरू होऊन १:२६ वाजता समाप्त होईल.

ग्रहणाची एकूण कालावधी ३ तास ३० मिनिटे असेल. या ग्रहणाचा सूतक काळ दुपारी १२:५२ वाजता लागेल. सूतक काळात मूर्तीपूजा, भोजन, धार्मिक कार्य वर्ज्य असते. मात्र,

**चंद्रग्रहणाचे वेळापत्रक:**
- **ऊपछाया प्रवेश – रात्री ८:५७**
- **ग्रहण स्पर्श – रात्री ९:५७**
- **पूर्णता प्रारंभ – रात्री ११:००**
- **ग्रहण मध्यकाल – रात्री ११:४१**
- **पूर्णता समाप्त – रात्री १२:२३**
- **ग्रहण मोक्ष – रात्री १:२७**
- **ऊपछाया समाप्त – रात्री २:२७**

**श्राद्धासंदर्भातील मार्गदर्शन:**

श्राद्धविधी आणि दान शक्य असल्याचे निर्णय सिंधू ग्रंथात स्पष्ट नमूद आहे.

'जो व्यक्ती चंद्र वा सूर्यग्रहणात विधिपूर्वक श्राद्ध करतो, त्याला पृथ्वी दान करण्यासारखे पुण्य लाभते,' असे निर्णय सिंधू ग्रंथाच्या पृष्ठ ९४ व ९५ वर नमूद आहे. यावेळी कच्च्या अन्नाने अथवा सुवर्णद्वारे श्राद्ध केल्यास विशेष फल प्राप्त होते. ब्राह्मणांना भोजन घातल्यास यजमानास अनंतगुणित पुण्यप्राप्ती होते. परंतु, ग्रहणकाळात दान घेणाऱ्या ब्राह्मणास दोष प्राप्त होतो. यामुळे इच्छुकांनी दुपारी १२:५२ वाजण्यापूर्वी श्राद्धविधी पूर्ण करून घेणे हितावह ठरेल, असे मत पुरोहित संघाने मांडले.

बैठकीत उपस्थित मान्यवर:

बैठकीस पं. बाबूलाल तिवारी, रतन तिवारी, श्याम सुंदर अवस्थी, सुमित तिवारी, प्रमोद तिवारी, लाला तिवारी व पं. रविकुमार शर्मा प्रमुख उपस्थित होते. पुरोहित संघाने भाविकांना आवाहन केले आहे की, चंद्रग्रहणाचे नियम पाळून, विधिपूर्वक श्राद्ध करावे व ग्रहणकाळात पूजाअर्चा टाळावी.

# उत्कृष्ट ग्रंथालय आणि ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना ग्रंथमित्र पुरस्कार दिला जातो. त्यासाठी दि. ३० सप्टेंबरपूर्वी जिल्हा ग्रंथालयाकडे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.ग्रंथमित्र पुरस्कार भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या नावे उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यांना दिला जातो. राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील 'अ', 'ब', 'क','ड' वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे १ लक्ष रू., ७५ हजार रु., ५० हजार रू. व २५ हजार रू. अशी रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार रू. तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी २५ हजार रू. रोख रक्कम. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरविण्यात येते.सन २०२४-२५ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र) यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह दिनांक ३० सप्टेंबरपूर्वी तीन प्रतीत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक मा. गाडेकर यांनी केले आहे.

# भाजप कार्यकर्ता निवृत्ती आगरकर च्या आग्रहाखातर खा.अनुपदादा थांबले चहाच्या स्टॉल वर

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : बाळापूर विधानसभा मतदारसंघात आज खा अनुपदादा धोत्रे यांचा मांजरी, हाता, निंबा, टाकळी खोजबोड येथे सांत्वनपर भेटी देण्याचा नियोजित दौरा होता मांजरी येथून खा अनुपदादा हातरून मार्गे जाणार हि माहिती हातरून येथील भाजप कार्यकर्ते निवृत्ती आगरकर, प्रवीण हेलगे, मुरलीधर माळी, मंजूर शाह यांना समजली आणि निवृत्ती आगरकर यांनी मुरलीधर माळी, मंजूर शाह, प्रवीण हेलगे यांना खा अनुपदादा यांनी आपल्या स्टॉल वर चहा पिण्यासाठी थांबण्याचा आग्रह करावा असं मत मांडलं कार्यकर्त्यांनी भाऊंना निवृत्ती ची इच्छा सांगितली यांनी युवा खासदार अनुपदादानी गाडी थांबवून निवृत्ती च्या स्टॉल वर चहा घेतला आणि दिलखुलास गप्पा देखील मारल्या आणि निवृत्ती च्या चहाच्या क्वालिटी ची तारीफ देखील केली यावेळी त्यांच्या सोबत तालुका अध्यक्ष किशोर कुचके, जिल्हा



उपाध्यक्ष गणेश तायडे, अमोल साबळे, दिलीप पटोकार,राऊत पाटील, सरचिटणीस राजेश्वर वैराळे, विनायक वैराळे, मनिष वैराळे, विठ्ठलराव प्र वैराळे,पुरुषोत्तम शेळके आदी भाजप पदाधिकारी खा अनुपदादा धोत्रे यांच्या दौऱ्यात सहभागी होते सर्वसामान्य माणसात मिसळणारे खा अनुपदादा निवृत्ती आगरकर मी सहज इच्छा व्यक्त केली की खा अनुपदादा धोत्रे माझ्या चहा च्या स्टॉल वर थांबून चहा घ्यावा मला अपेक्षा नव्हती की इतका मोठा माणूस माझ्या विनंती ला मान देऊन चहा घेण्यासाठी थांबेल म्हणून पण भाऊ थांबले आणि मला जाणीव झाली की खरंच खा अनुपदादा असामान्य व्यक्तिमत्व असूनही सर्वसामान्य माणसात मिसळून जातात खरंच खासदार असावा तर असा.

# सोयाबीन येलो मोझाइक बाबत शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मार्गदर्शन



■बोरगावमंजू,दि ३० (प्रतिनिधी) : शेती करताना शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागत आहे. ऑगस्टच्या प्रारंभीस अतिवृष्टीने उभ्या पिकाची नुकसान झाले तर हे संकट टळट नाही तेच नव्याने सोयाबीन पिकावर येलो मोझॅक या प्रादुर्भावामुळे सोयाबीन पिवळी पडत आहे. फुलोऱ्यात असताना फुले कळ्या शेंगा कोमजून खाली पडत आहे. यासंदर्भात वृत्त प्रसिद्ध होताच कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ शास्त्रज्ञ अकोला यांनी दखल घेत बोरगाव मंजू मंडळातील शेतीच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान श्री विलास वाशीमकर तालुका कृषी अधिकारी अकोला, डॉ.पी. के . राठोड सहाय्यक प्राध्यापक कीटकशास्त्र विभाग डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, विजय महाजन उपकृषी अधिकारी, अजय देशमुख सहाय्यक कृषी अधिकारी बोरगाव मंजू यांनी सोयाबीन पिकांची संरक्षण व उपाययोजना कीटकनाशके औषधे फवारणी सह उत्पादन वाढ होईल.

# महात्मा फुले युवा दल जिल्हा उपप्रमुखपदी रवींद्र तायडे यांची निवड

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : दानापूर येथील उत्साही व जनसंपर्कात निपुण असलेले सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पुंडलिकराव तायडे यांची महात्मा फुले युवा दल अकोला जिल्हाउपप्रमुख पदी निवड झाल्याने जिल्हाभरात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.ही निवड महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख



ॲड. सतीशजी शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन जाहीर करण्यात आली. आपल्या या सन्माननीय निवडीचे श्रेय ॲड. शिंदे साहेबांना देतात व त्यांचे धन्यवाद मानतात. रवींद्र तायडे यांनी सामाजिक कार्य अधिक जोमाने व निष्ठेने पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.रवींद्र तायडे यांनी आजवर अनेक महत्त्वाच्या पदांवर काम करून स्वतः ठसा उमटवला आहे. भारतीय माळी महासंघ युवक आघाडी तेल्हारा तालुकाध्यक्ष, अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास तालुका कार्याध्यक्ष, तसेच कार्यकर्ता म्हणून लोकांची सेवा करत

# पातुर तालुक्यातील रस्त्यांची दयनीय अवस्था

## भाजप कार्यकर्त्यांकडून खासदार अनुप धोत्रे यांना निवेदन

■पातुर,दि ३० (प्रतिनिधी) : पातुर तालुक्यातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाल्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यांच्या तातडीने सुधारणा करण्यासाठी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खासदार अनुप धोत्रे यांना निवेदन दिले.

निवेदनात नमूद केल्यानुसार, तालुक्यातील अनेक रस्ते खराब अवस्थेत असल्यामुळे शाळा, महाविद्यालये, न्यायालय, प्रशासकीय कार्यालये तसेच व्यापार व आरोग्यविषयक कामांसाठी वारंवार तालुका व जिल्हा स्थानिक ठिकाणी जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे दळणवळणाची साधने ठप्प होत असून, गावकऱ्यांचा वेळ आणि पैसा वाया जात आहे.याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन पातुर तालुक्यातील रस्त्यांची सुधारणा एम.एस.आय.डी.सी. महामंडळाच्या हायब्रीड मॉडेल अंतर्गत करावी, अशी मागणी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद आहे.निवेदनात विशेषतः खालील रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी करण्यात आली आहे : माझोड - तांदळी - बाबुळगाव मार्गपातुर - मलकापूर - बेलतळा - पळसखेड- असोला - अंबाशी - चरणगाव मार्गसायवनी- मळसूर - पहाडशिंगी - झरंडी- मिरची- चोंडी - पिंपळोली - गावंडगाव - मळसूर - पांगरा मार्गपातुर शहरातील पातुर ते मोर्णा कॉलनी मार्ग, आगिखेड रस्ताया रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे वाहतुकीवर मोठा परिणाम होत असून शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी, महिला व रुग्णवाहिका यांना देखील याचा त्रास सहन करावा लागत आहे.निवेदन देणाऱ्यांमध्ये भाजप कार्यकर्ते प्रवीण देशपांडे, पुंडलिकराव आखरे, श्रीकांत बराटे, डॉ. अरविंद देशमुख मिठाराम नाकट, अक्षय जैन प्राध्यापक जीएस खंडारे सूर्यकांत जोशी, लाहोळे यांच्यासह पातुर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांचा समावेश होता.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार!

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीतील एका अल्पवयीन मुलीवर लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. हा प्रकार एवढ्यावरच न थांबता आरोपी युवकाने तिचे अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचे खदान पोलिसात दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी खदान पोलिसांनी आरोपी युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सागर रमेश सावळे याने सन २०२३ ते २७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

# सुमिरमा फाउंडेशनचा पर्यावरणपूरक उपक्रम 'निर्माल्य कलश रथ' पुन्हा अकोल्यात

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : गणेशोत्सव आणि इतर धार्मिक उत्सवांमध्ये देवाला अर्पण केले जाणारे फुले, हार, दुर्वा, बेलपत्र यांसारखे निर्माल्य थेट नदीत टाकल्याने होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी, सुमिरमा फाउंडेशन दरवर्षीप्रमाणे यंदाही 'निर्माल्य कलश रथ' उपक्रम हाती घेत आहे. शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ पासून, हा उपक्रम सुमिरमा फाउंडेशनच्या कार्यालयापासून अधिकृतपणे कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्यानंतर, अकोला शहरात निर्माल्य कलश रथ फिरवण्यात येईल, ज्याच्या माध्यमातून श्रद्धेने अर्पण केलेले हार, फुले, दुर्वा, बेलपत्र इ. निर्माल्य वेगळ्या पद्धतीने संकलित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे नद्यांचे आणि पाण्याचे प्रदूषण टाळणे आणि श्रद्धा-परंपरेची जोड राखून पर्यावरणपूरक मार्गाचा अवलंब करणे. फाउंडेशनने नागरिकांना आवाहन

**हार, फुले, दुर्वा, बेलपत्र यांसारखे निर्माल्य नदीत टाकू नये; जलप्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे – फाउंडेशनचे आवाहन**

केले आहे की, त्यांनी निर्माल्य नदीत न टाकता कलश रथात टाकून पर्यावरण रक्षणात आपले योगदान द्यावे. 'महाकाय सूर्यकोटी समप्रभ...' या मंत्रातील आध्यात्मिक भावनेने प्रेरित होऊन, हा उपक्रम श्रद्धा आणि जबाबदारी यांचा सुंदर संगम घडवतो, असे मत संस्थेने व्यक्त केले आहे. अधिक माहिती करीता सुमिरमा फाउंडेशन कार्यालय, अकोला मो .९०९६६५५६०० यह क्रमाकावर संपर्क करावाआपली श्रद्धा ही पर्यावरणासाठी हानिकारक न ठरता, सुरक्षित व शाश्वत उपक्रमात रूपांतरित व्हावी, हीच सुमिरमा फाउंडेशनची अपेक्षा!

# दीड दिवसाच्या गणपतींचे विसर्जन

**अकोला :** दीड दिवसाच्या गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवादरम्यान दीड, पाच, सात आणि दहा दिवसांच्या गणपतीची स्थापना करतात. गुरुवारी दुपारी ३ वाजेपर्यंत दीड दिवसाच्या गणपती मूर्तीचे कृत्रिम तलाव, गणेश घाट, नदीमध्ये विसर्जन करण्यात आले.

# भोपळे विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा




■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी भारताचे महान हॉकीपटू 'हॉकीचे जादूगार' ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त खेळाडू विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल कुमार भोपळे हे होते.प्रमुख उपस्थितीत संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे,उपाध्यक्ष सुनील राऊत,माजी केंद्रप्रमुख प्रकाश राऊत,शाळा व्यवस्थापन समितीचे गणेश राठोड,सत्यदेव तायडे,सहकार्यवाह स्नेहल भोपळे,प्राचार्य संतोषकुमार राऊत हे होते. यात्रसंगी क्रीडा स्पर्धेत यशवंत विद्यार्थ्यांचा गौरव उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे यांनी मार्गदर्शनपर मनोगतात सांगितले की, भोपळे विद्यालयात खेळाडूं विद्यार्थ्यांसाठी विविध योजनाचा सुविधा मिळणार आहे.यात संस्थेचे संस्थापक स्व.दादासाहेब भोपळे व मार्गदर्शिका स्व.कमलिनीताई भोपळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आजी- आजोबा खेलरत्न पुरस्कार, क्रीडा शिष्यवृत्ती योजनेचा समावेश आहे,असे सांगितले.तसेच या योजनेचा लाभ आजच्या या दिनापासून संस्थेच्या वतीने केला जात आहे.

# पणज येथे सोमवारी महालक्ष्मी यात्रा महोत्सव

**अकोट:**सालाबादप्रमाणे यंदाही ग्राम पणज ता. आकोट येथे ज्येष्ठ गौरी पूजना निमित्ताने बोर्डी नदीच्या काठावरती पुरातन महालक्ष्मी मातेचे मंदिर व पुरातन पाय विहीर व भव्य दीपमाळा आजही साक्ष आहे महालक्ष्मी मातेचे माहेर अडीच दिवसाचे असून गणेशाचे आगमनाबरोबरच या निमित्ताने मंदिरावर भव्य यात्रा महोत्सव महाप्रसाद आयोजन असते, पंचक्रोशीतच नव्हे तर परराज्यात सुध्दा प्रसिद्ध असलेल्या माता श्री महालक्ष्मी देवीची यात्रा दि.१ सप्टेंबर २०२५ सोमवारी गावकरी व गावकऱ्यांनी व्यवस्थापन करण्यासाठी नेमुन दिलेल्या समिती ने आयोजित केली असून सर्व भावीक भक्तांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या व्यापारी बंधुना समिती तर्फे नम्रपणे आवाहन करण्यात येते की, अती पावसामुळे मंदीर परिसरात दुकाने लावण्यासाठी जागा उपलब्ध नसले मुळे सर्व व्यापारी बंधुनी आपली दुकाने गावामध्येच लावावी.

# कर्ता हनुमान मंडळचा गजानन महाराज मंदिरात ऋषिपंचमी उत्सव साजरा

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) : साला बादप्रमाणे चालू असलेलेल्या कर्ता हनुमान मंडळ येथे गजानन महाराज मंदिरात ऋषिपंचमी उत्सव दर वर्षी साजरा करण्यात येतो पूजा अर्चना गजानन महाराज चे भजन व अभंग गायन करून साजरा करण्यात येतो हा उत्सव चतुर्मास मध्ये येत असल्यामुळे चतुर मासा मुळे महिला पुरुष वारकरी मंडळी चा फार मोठा सहभाग असतो रात्री कळस स्थापना करून २४ सर्व एरियातील मंडळी विना वाजवीतात ह भ प सुखदेव वाडकर महाराज व ह भ प गजानन माळी, ह भ प प्रकाश कुलट ही महाराज मंडळी सुंदर असे अभंग मनून व महिला सुधर असे भजने मनून वारकरी



मंडळी ना मंत्र मुग्न करतात सकाळी काकडा आरती ८ ते १० पुरुष मंडळी भजन दुपारी ४ ते ५ महिलाचा भजन व हरिपाठ व दुपारी महाप्रसादाने सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्र संचालन माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय वेध यांनी केले, मंदिर मध्ये आजीवन सेवक मनून विठ्ठल चिकटे, चंद्रकांत ताठे यांचे मोलाचे मदत असते कार्यक्रमाला खालील वारकरी महिला पुरुष उपस्तिथी होती गजानन धरमकर भिकाजीं भगत, शरद कोकाटे, रमेश शेरेकर, संजय बहाल, सेलसींग सिसोदिया,शरद लोटे, दिवाकर देशमुख, देवराव उजाडे, मुरलीधर आवटे, मुरलीधर अंधारे,वसता माळी,संतोष जाधव, उमेश अग्रवाल, मोहोन सिसोदिया, प्रकाश जाधव, माजी नगर सेविका सौ मंगला म्हैसने, शर्मा बाई,सौ तायडे,सौ गोदावरी शेरेकर, अर्चना आगरकर, संध्या बचे, शिला माळी,सौ बेबीताई ताले, सौ कीर्ती कोकाटे, कु मुक्ता शेंडे व कर्ता हनुमान मंडळाच्ये भाविक उपस्थित होते.


RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# भक्तिमार्ग

**आबालवृध्दांची लाडकी देवता म्हणून गणपतीचा उल्लेख होत असला तरी या देवतेच्या उत्पत्तीपासून पूजनापर्यंत, पूजनपद्धतींपर्यंत प्रत्येक भाग अभ्यासाची, किंबहुना संशोधनाची बाब ठरते. या देवतेचं मूळ शोधण्यासाठी, मूळ स्वरुप शोधण्यासाठी, काळाप्रमाणे तिच्या स्वरुपात झालेले बदल बघण्यासाठी काही युगांचा धांडोळा घ्यावा लागतो. असाच एक प्रयास...**

# गणपती, दैवत आणि धारणा

गणेशोत्सव गणपती हे अनेकांचं आराध्यदैवत. दर वर्षी भाविकांच्या घरी येणारा, यथोचित पाहुणचार झोडणारा, आपल्या कलाविष्काराचा आनंद लुटणारा आणि ठरल्या दिवशी स्वगृही परतणारा हा देव आबालवृद्धांना प्रिय आहे. उत्सवी साजरीकरण, उत्सवाला जोडलेला सामाजिक आशय, या निमित्ताने ज्वलंत प्रश्नांना भिडण्याची, समाजजागृतीची मिळणारी संधी या पार्श्वभूमीवर या उत्सवाचं महत्त्व दिसामाजी वाढत आहे. नवीन पिढी परंपरागत रुढी मोडून, कर्मकांडाचा बागुलबुवा न धरता या उत्सवाचा आनंद लुटत आहे. या भारलेल्या वातावरणात उठणाऱ्या आनंदलहरी प्रत्येकातील सद्भावनेला साद घालतात. अशा या कलेच्या, बुद्धीच्या अधिपतीचं नेमकं स्वरुप काय हेदेखील जाणून घ्यायला हवं. या माहितीद्वारे या देवतेप्रती वेगळ्या अंगाने काही मूलभूत पण महत्त्वपूर्ण पैलूंचा वेध घेता येईल. जाणिवा विस्तारण्यास त्याची मदत होईल.

प्रत्येक संस्कृतीत काही बदल घडत असतात. त्याचं वैचारिक बदलांचं प्रतिबिंब त्यांच्या देवतास्वरुपात पडणं स्वाभाविक आहे. गणपतीची निर्मिती ही तर राजकीय आणि अध्यात्मिक संस्कृतीच्या मिश्रणातून झाली आहे असं इतिहासाचा मागोवा घेता म्हणता येईल. भारतात प्राचीन काळात गणराज्य व्यवस्था होती हे सर्वांना माहीतच आहे. ही गणराज्यं लोकशाही पद्धतीनं चालत. सर्वच नागरिक आपापल्या राज्याचे निर्णय एकत्र घेत. या गणराज्याच्या प्रमुखाला गणपती अशी संज्ञा होती. या गणपतीचा अधिकार मोठा असला तरी त्याची पूजा वगैरे होण्याचं काही कारण नव्हतं पण गणांचा अधिपती तो गणपती ही धारणा कायम राहिली. प्राचीन काळी गणपती गजमुख नव्हता. गणपती हे स्वतंत्र दैवत बनू लागलं असलं तरी त्याचं रुप हे यक्ष संस्कृतीतून आलं होतं. तुंदिलतनू पण सोंड नसलेला गणेश हे त्याचं आद्य रुप होय. हा दैवतस्वरुप गणपती हरियाना-पंजाबमधील व्रात्य या संस्कृतीत पुजला जात होता. गंगेच्या खोऱ्यात त्याचं यक्षस्वरुपच पुजलं जात होतं पण सिंधूसंस्कृतीत शेंदूर लावलेल्या गजमुखाचा मुखवटा हडप्पा येथे मिळाला आहे. तेथील लोक नृत्य करताना हे गजमुख मुखवटे परिधान करत असावेत असं तज्ज्ञ म्हणतात. तत्कालीन भारतात असंख्य टोळ्या रहात होत्या. प्रत्येक टोळीचं स्वत:चं असं देवक आणि टोळीचिन्ह अथवा गणचिन्ह असे. हे चिन्ह त्यांना इतरांपासून आपलं वेगळं अस्तित्व दाखवायला कामी येत असे आणि तेच त्यांचं देवक आणि आराध्य बनत असे. ही देवकं विविध प्राणी, पक्षी आणि वृक्षही असत. आजही भारतातील अनेकविध जातीसमाजांनी ही देवक प्रथा जपली आहे. हडप्पा येथील लोक हत्ती हे देवक आणि गणचिन्ह वापरत असण्याची शक्यता आहे. असे अनेक समाज असू शकतील ज्यांचं देवक हत्ती असेल. पुढे राज्य विस्तारामुळे विविध टोळ्यांमध्ये सम्मिलन झाल्याने मुख्य दैवतात अन्य टोळ्यांची गणचिन्हंही सामावली गेली. गजमुख, नागबंधन आणि मूषक वाहन ही चिन्हं गणपतीला याच सम्मीलनाच्या प्रक्रियेतून मिळाली.

गणपती ही वैदिक देवता नाही. गणपती ही मूळची वैदिकेतर देवता आहे याबाबत पाश्चात्य आणि भारतीय विद्वानामध्ये जवळपास एकमत आहे. सिंधूसंस्कृतीत पुरा-गणेशाचं भौतिक अस्तित्व सापडलं असल्यामुळे ते यथायोग्यही आहे. काही वेदपूर्व हिंदू गण (मानवसमूह) हत्ती हे आपलं देवक मानत असत. टोळी नृत्य, युद्ध अथवा धार्मिक कार्यक्रमांच्या प्रसंगी गजमुख असणारे मुखवटे घालण्याची प्रथा त्यांच्यात होती. गजमुखाची शिल्पंही देवकप्रथेतून निर्माण झाली. या गजमुखाला पुरातन काळी नरबळी दिला जात असल्याचे पुरावेही मिळतात. पुढे ती प्रथा पशुबळीत बदलली. पुढे मनुष्य सुसंस्कृत झाला तसं बळीप्रकरण थांबलं आणि रक्तवर्णी शेंदुराने गणेशमुर्ती माखली जावू लागली. पूजा हा मूळचा द्राविड शब्द आहे. नंतर भारतात आलेल्या वैदिक धर्मात मूर्ती अथवा प्रतिमापूजाकांड नव्हतं. ङ्कपूजाफ या शब्दाचा अर्थ आहे ङ्कमाखणं अथवा शिंपणं. म्हणजे मूर्तीला रक्त किंवा तेल माखून अथवा जल शिंपडून केली जात होती ती ङ्कपूजाफ हडप्पा येथे सापडलेल्या गणेशमुखाकडे बारकाईने पाहिलं तर शिरोभूषणावरील शेंदुराचे अस्पष्ट अवशेष पहायला मिळतात. सिंधुकाळी गणेशाचं शिरोभूषण तत्कालीन प्रचलित शिरोभूषणाप्रमाणेच होतं. तशी शिरोभूषणं अनेक प्रतिमांवर आढळून येतात. गज, नाग, मूषकादि देवकं असणारे भिन्न गण संमलीत होऊ लागले तसतशी ती देवकंही एकाच गणेशात सामावली गेली. म्हणजे नागबंधाच्या रूपात नाग गण, मूषकवाहनाच्या रूपात मूषक गण असं सम्मिलन कालौघात झाल्याचं इतिहासावरून दिसतं. गणेश आणि शिव मूळचे एकच असाही एक मतप्रवाह विद्वानांमध्ये आहे. शिव त्रिनेत्र आणि भालचंद्र आहे तसाच गणेशही आहे. शिव गणांचा अधिपती आहे तसाच गणपतीही आहे. गणेशाला गजमुख आहे तर शिव गजचर्म नेसतो. शिवाच्या या स्वरुपातील असंख्य प्रतिमा कुशाणकालीन नाण्यांवर पहायला मिळतात. किंबहुना, काही समुदायांनी शिवालाच गजमुखाच्या स्वरुपातही पाहिलं असावं. कालौघात गणपती ही स्वतंत्र पण शिवपुत्र असणारी देवता म्हणून जनमानसात स्थिर झाली. गणेशाच्या उत्पत्तीच्या पौराणिक भाकडकथा वगळल्या तरी त्याला अयोनिज का मानलं जातं, हे यावरून लक्षात येतं.



पुरातन काळापासून वैदिक यज्ञधर्मी आणि अवैदिक मूर्तीपूजकांमध्ये, ज्यांना वैदिकजन ङ्कव्रात्यफ म्हणत, धार्मिक संघर्ष होता. धर्मेतिहासात याचे अनेक पुरावे पहायला मिळतात. गणेशाचं एक नाव ङ्कव्रातपतीफ असं आहे, हे गणपत्यथर्वशीर्षातून समोर येतं. व्रत करणारे ते व्रात्य. अवैदिक लोक यज्ञविरोधक होते. ते यज्ञात व्यत्यय आणत असत. त्यामुळेच की काय, यज्ञ सुरू करण्याआधी विघ्नकर्त्या विनायकाची शांती करणारे मंत्र म्हटले जात आणि त्याला ङ्कविघ्न न आणता दूर मुंजवत पर्वतावर निघून जाफ अशी आवाहनं केली जात. म्हणजेच वैदिकजनांसाठी गणेश हा प्रारंभी ङ्कविघ्नकर्ताफ होता तर अवैदिकांसाठी तो ङ्कविघ्नहर्ताफ होता असं दिसून येतं. वैदिक साहित्यामध्ये कार्यारंभी अथवा ग्रंथांच्या आरंभी गणेशवंदना दिसत नाही ती यामुळेच. महाभारताची सुरुवातही नारायण-सरस्वती या दैवतांना वंदन करून होते, गणेशाला नाही हे ही इथे लक्षात घ्यायला हवं. किंबहुना, चारही वेदांमध्ये हिंदुंना पवित्र असणारा ओंकार येत नाही तसंच योगही येत नाही. गुप्तकाळात मात्र सांस्कृतिक उलथापालथ सुरु झाली. गुप्तांनी वैदिक धर्माला राजाश्रय दिल्यामुळे त्या धर्माचं वर्चस्व वाढणं स्वाभाविक होतं. धर्मप्रचाराची ही संधी पाहून त्यांनी संमिश्रणाची सुरुवात केली. गणपतीची लोकप्रियता लक्षात घेता त्यांनी या देवतेला नंतर विघ्नकर्ता नव्हे तर विघ्नहर्ता या रूपात स्वीकारलं, असं महामहोपाध्याय पां. वा. काणे यांनी प्रतिपादित केलं आहे. वैदिक ब्रह्मणस्पति आणि गणपती यांचं तादात्म्य साधण्याचे प्रयत्न झाले असले तरी गणेशाचं मूळ अवैदिक रूप पुसणं मात्र जमलं नाही. गणपती अथर्वशीर्ष अथर्ववेदाचा भाग मानण्याची प्रथा असली तरी ते वास्तव नाही. अथर्ववेदात गणपती आढळत नाही. अथर्वशीर्षातील ङ्कगणानां त्वा गणपतिं हवामहेफ हे मूळचं ऋग्वेदातील (ऋ. २.२३.१) आवाहन असून ते ब्रह्मणस्पतीला उद्देशून आहे, आपण पुजतो त्या गणपतीला नाही पण इथे शब्दसाधर्म्याचा उपयोग करून गणेशाचं वैदिकीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसतो. तसा प्रकार रुद्र या वैदिक देवतेच्या आणि वेदपूर्व शिवाच्या बाबतीतही झाला. पण शिवाला शक्ती अथवा पार्वती ही पत्नी आहे, वैदिक रुद्राला मात्र नाही. शिवाला पिता नाही, तो अजन्मा मानला जातो. रुद्राला पिता तर आहेच पण किमान ११ रुद्र असल्याची नोंद वैदिक साहित्यात मिळते.

भक्ती विशेष

भारतीय वेदपूर्व धर्म हा आगमिक, म्हणजेच तंत्राधारित असल्याने गूढ सांकेतिकता हा त्याचा भाग होता. गुप्तकाळात वैदिक धर्माविरुद्ध उठलेल्या प्रतिक्रियेतून आगमिक धर्माने वैदिक स्वरुप दिलं जाणाऱ्या गणेशाला वेगवेगळ्या पद्धतीने मूळ तंत्रस्वरुपात आणण्याचा हिरीरीने प्रयत्न केला. त्याला तंत्रकाळ असंही म्हणतात. म्हणूनच शिव-शक्तीप्रमाणेच गणेशही एक महत्त्वाची तांत्रिक देवता बनला. किंबहुना, गणपतीला मिळालेली अनेक नावं ही तंत्रधर्माने दिली आहेत. ङ्कशारदातिलकफ ग्रंथात गणपतीच्या ४४० ध्यानमूर्ती वर्णिल्या असून त्यांची वेगवेगळी नावं आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे सर्वच्या सर्व अष्टविनायकाची स्थानं महाराष्ट्रात आहेत. येथूनच ही देवता संपूर्ण देशात आणि देशाबाहेर पसरली असावी, असा तर्क करायला वाव आहे. भारतात गणपतीची स्वयंभू तशीच लोकप्रसिद्ध स्थानं हजारोंच्या घरात आहेत. गणपती म्यानमार, सयाम, कंबोडिया, बाली, तुर्कस्थान तसंच चीनमध्येही आढळतो. हा प्रसार आगमैक हिंदुंमुळे झाला अशी मान्यता आहे. काही वाममार्गी तांत्रिकांमुळे काही लोक गणेशाचीही तशा पद्धतीने पुजा करत असत पण लोकांना ती न आवडल्याने वाममार्गी पूजा बंद झाली. चीनमध्ये तर सम्राट चेन्त्सुंगने आज्ञापत्र काढून गणपतीची तांत्रिक पूजापद्धत बंद पाडली असा दाखला पहायला मिळतो. अशी ही विश्वव्यापी देवता. तिला वंदन करुन उज्ज्वल भविष्यकाळासाठी आशिष मिळवू या.

# मंत्र गणेशाचे...

हिंदू धर्मात विविध मंत्र सांगितले आहेत. मंत्रोच्चारांमध्ये प्रचंड शक्ती असते. मंत्रांचा उच्चार योग्य पद्धतीने करणं गरजेचं असतं. मंत्रोच्चारांमधून निर्माण होणाऱ्या लहरींचे लाभ आपल्याला मिळू शकतात. गणेशाच्या मंत्रांना सिद्धी मंत्र असंही म्हटलं जातं. या मंत्रांच्या उच्चाराने सकारात्मक परिणाम साधले जातात.

* ओम गं गणपतये नम: हा गणपतीचा मूळ मंत्र आहे. याला बीज मंत्र असंही म्हटलं जातं. योगसाधना करताना या मंत्राचा जप केला जातो. या मंत्राची नोंद गणपती उपनिषदामध्ये आढळते. कोणतीही नवी गोष्ट सुरू करण्याआधी हा मंत्र म्हटल्याने सगळी विघ्नं दूर होतात.

* ओम श्री गणेशाय नम: हा मंत्र प्रार्थना, प्रेम आणि गणेशाप्रती असलेली भक्ताची श्रद्धा दर्शवतो. या मंत्राच्या उच्चराने गणेशाची कृपादृष्टी प्राप्त होते.

* ओम एकदंताय नम: या मंत्रातही प्रचंड ऊर्जा सामावली आहे. या मंत्राच्या उच्चारामुळे आपण द्विधा मनस्थितीतून बाहेर पडतो. एकाग्रतेने गणेशाची आराधना करू शकतो. मन एकाग्र करण्याची शक्ती या मंत्राने प्राप्त होते. ओम सुमुखाय नम: या मंत्राचा अर्थही अनोखा आहे. या मंत्राच्या पठणाने आपण अंतर्बाह्य सुंदर बनतो. मन:शांतीचा लाभ होतो.

* ओम क्षिप्र प्रसादाय नम: या मंत्राच्या पठणाने नकारात्मक ऊर्जा, विघ्न दूर होतं. क्षिप्र म्हणजे तातडीने किंवा जलद गतीने. जीवनात आलेल्या विघ्नाचा सामना कसा करायचा हे कळत नसेल तर या मंत्राचा जप करावा. तुम्हाला चांगला मार्ग नक्कीच मिळेल.

मंत्रजागर

* ओम भालचंद्राय नम: हा मंत्रही सकारात्मक ऊर्जेचा स्रोत आहे. भालचंद्र हे गजाननाचं नाव आहे. भालचंद्र म्हणजे मस्तकावर चंद्र धारण केलेला. या मंत्राच्या उच्चाराने सर्व विघ्नांचा नाश होतो. ओम गणाध्यक्षाय नम: हा मंत्रही खूप महत्त्वाचा आहे. या मंत्राच्या पठणाने सर्व दु:खं दूर होतात. एखाद्या समाजाचं, समुहाचं किंवा देशातल्या जनतेचं दु:ख दूर करण्यासाठी या मंत्राचं पठण करता येतं.

* ओम विनायकाय नम: हा मंत्रही विघ्ननाशनासाठी उपयुक्त ठरतो. विनायक म्हणजे सर्व समस्यांचा नाश करणारा. त्यामुळे या मंत्राच्या उच्चाराने आयुष्यातले प्रश्न, समस्या दूर व्हायला मदत होते.

* ओम विघ्न नाशनाय नम: या मंत्रातच याचा अर्थ दडला आहे. या मंत्राच्या उच्चाराने सर्व विघ्नांचा नाश होतो. तसंच आयुष्यातल्या अडचणी दूर होतात.

# स्तवन गणेशाचे...



सुखकर्ता, दु:खहर्ता ही आरती समर्थ रामदासांनी रचली. समर्थांनी रचलेली ही आरती आज सगळीकडे मनोभावे गायली जाते. दासबोधाची रचना करतानाही समर्थांनी गणेशाला वंदन केलं आहे. गणेश हा विघ्नहर्ता, सर्व देवतांमध्ये प्रथम पूजनीय असा देव. म्हणूनच पहिल्या दशकातल्या दुसऱ्या समासात समर्थ गणेशस्तवन करतात. गणेशाची स्तुती करतात. ते म्हणतात की, ओम नमोजी गणनायका। सर्वसिद्धी फळदायका। अज्ञानभ्रांती छेदका। बोधरूपा।।१।। माझिये अंतरी भरावे। सर्वकाळ वास्तव्य करावे। मज वाक्शून्यास वदवावे। कृपाकटाक्षे करूनी।।२।। तुझिये कृपेचेनिं बळे। वितुळती भ्रांतीची पडळे। आणि विश्वभक्षक काळे। दाश्यत्त्व कीजे।।३।। येतां कृपेची निजउडी। विघ्ने कापती बापुडी। होऊन जाती देशधडी। नाममात्रें।।४।। याचा अर्थ असा की सर्व सिद्धी आणि फळ देणाऱ्या, अज्ञान दूर करणाऱ्या, बोधस्वरूप असलेल्या गणनायकाला मी वंदन करतो. तू माझ्या अंत:करणात सामावून सर्वकाळ तिथे वास्तव्य करावे. तुझ्या कृपाकटाक्षाने माझं अज्ञान दूर करावं. तसंच माझ्या मुखाने ग्रंथ वदवून घ्यावा. तुझ्या कृपेमुळे भ्रांतीची पटले वितळून जातात. विश्वभक्षक असा काळही तुझ्या कृपेने दास बनतो. गणेशाची कृपा झाली की विघ्नं कापू लागतात. गणेशाच्या नामस्मरणानेही ती देशोधडीला लागतात. म्हणूनच गणरायाला विघ्नहर असं म्हटलं जातं.

बोध

ते पुढे म्हणतात की ध्यान गणेशांचे वर्णिता। मतिप्रकाश होये भ्रांता। गुणानुवाद श्रवण करिता। वोळे सरस्वती।।२६।। जयासि ब्रह्मादिक वंदिती। तेथे मानव बापुडे किती। असो प्राणी मंदमती। तेहीं गणेश चिंतावा।।२७।। या गणेशाच्या ध्यानाचं वर्णन केलं असता भ्रमित चित्त माणसाची बुद्धीही प्रकाशमान होते. त्याच्या गुणांचं श्रवण केल्याने प्रत्यक्ष सरस्वती प्रसन्न होते. ब्रह्मादी देवही ज्याला वंदन करतात त्यापुढे बापुडे मानव ते काय म्हणावे. मंदमती असणाऱ्यांनी श्रीगणेशाचे चिंतन करावे. अशा या देवाधिदेव गणपतीची महती रामदासस्वामी वर्णन करतात.



# यांचा लाभ घ्यावा...

काही गोष्टी घेताना संकोच करू नये, असं मनुस्मृतीतला एक श्लोक सांगतो. हा श्लोक आणि त्याचा अर्थ आपण जाणून घेऊ.

स्त्रियो रत्नान्यथो विद्या धर्म: शौचं सुभाषितम। विविधानी च शिल्पानि समादेयानि सर्वत:।। याचा अर्थ असा की, रत्न, विद्या, धर्म, पावित्र्य, उपदेश, भिन्न प्रकारची शिल्पं तसंच चारित्र्यवान स्त्रीला प्राप्त करण्यासाठी अजिबात संकोच करू नये. यापैकी पहिलं म्हणजे रत्न. ती वेगवेगळ्या प्रकारची असतात. मोती, पाचू, माणिक, पुष्कराज अशी अनेक रत्नं आहेत. ही रत्नं अनमोल असतात. हिराही बहुमूल्य आहे. तो कोळश्याच्या खाणीत सापडतो तर मोती समुद्रात सापडतात. तसं पहायला गेलं तर कोळशाची खाण आणि समुद्राचा तळ कधीही स्वच्छ नसतो पण इथे सापडणारी ही रत्नं बहुमूल्य असतात त्यामुळे रत्नं कुठेही सापडली तरी ती घेताना संकोच करू नये, असं मनुस्मृतीत नमूद करण्यात आलं आहे. ज्ञान घेतानाही संकोच करू नये. ज्ञानामुळे आपलं व्यक्तिमत्त्व संपन्न होत असतं. ज्ञानाचा समावेश आपल्या आचरणात करायला हवा. ज्ञानाची ओळख आपल्या वागण्यातून दिसायला हवी. ज्ञानाच्या मदतीने आपण आपली ध्येयं साध्य करू शकतो.

धर्मग्रंथातून

धर्म हा संस्कृत शब्द आहे. धर्म म्हणजे धारण करणं. धर्मामुळे आपण नियमात बांधलेले राहतो. त्यामुळे धर्मशिक्षण मिळत असेल तर ते जरूर घ्यावं. चांगले विचार ग्रहण करावेत. पावित्र्य फक्त शरीरापुरतं मर्यादित नाही तर आचार-विचार, वागणूक यातही पावित्र्य असणं गरजेचं आहे. आपले विचार शुद्ध असले पाहिजे. चारित्र्यही उत्तम असायला हवं. आपलं आचरण शुद्ध आणि पवित्र असेल तरच आयुष्यात आपलं ध्येय गाठणं शक्य होतं. संत-महात्म्याचा उपदेश ऐकायला हवा. या उपदेशातून आपण बरंच काही शिकू शकतो. बऱ्याच गोष्टी साध्य करू शकतो. त्यामुळे उपदेश ग्रहण करताना संकोच बाळगू नये. वेगवेगळ्या प्रकारची शिल्पं म्हणजे कला. कला शिकताना पूर्णपणे लक्ष द्यायला हवं. कला आत्मसात करायला हवी. या कलेच्या माध्यमातून तुम्ही उपजीविका करू शकता. कोणतंही शिक्षण कधीच वाया जात नाही. त्यामुळे कोणतीही कला निष्ठापूर्वक शिकायला हवी. सुंदर म्हणजे चारित्र्यवान स्त्री. अशी स्त्री माहेर आणि सासर अशा दोन्ही कुळांचा मान वाढवते. अशा स्त्रीला प्राप्त करण्याचा प्रयत्न करायला हवा. चारित्र्यवान स्त्री आपल्या पतीची साथ देते. त्याच्या संकटात सोबत राहते. तिच्या असण्याने संकटांचा सामना करण्याचं बळ पतीला मिळतं. त्यामुळे चारित्र्यवान स्त्रीशी विवाह करण्याची संधी कधीही सोडू नये.

घराघरात गणपती बाप्पा विराजमान झाला आहे. सगळीकडचं वातावरण कसं मंगलमय झालं आहे. मंगलमूर्तीच्या आगमनाने प्रसन्न वाटूलागलं आहे. घरांमधून, सोसायट्यांमधून आरतीचे मंगल सूर निनादू लागले आहेत. मंगलमूर्तीची आरती आपण तालासुरात गातो. आरती म्हणताना भक्तगणांमध्ये पराकोटीचा उत्साह आणि जल्लोष असतो. पूजाविधी संपन्न झाल्यानंतर आरती म्हटली जाते. आरती करण्याचं धार्मिक महत्त्व तर आहेच शिवाय वैज्ञानिक दृष्टीकोनातूनही आरतीकडे पाहता येतं. आरतीचे धार्मिक तसंच वैज्ञानिक अर्थ जाणून घेतले तर अनेक लाभ मिळू शकतात.



# महत्त्व आरतीचं...

* आरतीच्या थाळीमध्ये कापसाची वात, तूप, कापूर, फुलं, चंदन या वस्तू असतात. वात कापसापासून तयार केलेली असते. यात कसलीही भेसळ नसते. तूप दुधापासून तयार केलेलं असतं. कापूर आणि चंदन हे सुद्धा शुद्ध आणि सात्विक पदार्थ मानले जातात. तुपाचं निरंजन आणि कापूर एकत्रित पेटवल्याने वातावरणात विशिष्ट सुगंध भरून राहतो. यामुळे वातावरणातली नकारात्मक ऊर्जा दूर होते आणि सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

* यामुळे मनात चांगले विचार येतात. सुगंधित वातावरणामुळे मन:शांती मिळते. मन प्रसन्न होतं. उत्साह वाढतो.

* कोणतीही नकारात्मकता वरचढ होत नाही. आरती करताना शंख तसंच घंटा वाजवली जाते. आरतीच्या वेळी आपल्या इष्ट देवतेचं स्मरण केलं जातं. त्या देवतेवर आपण आपलं लक्ष केंद्रित करतो. यामुळे मनात सुरू असलेली घालमेल थांबते आणि आपण शांतचित्ताने देवतेची आराधना करतो.

# भोपाळचं चिंतामणी मंदिर

देशभरात गणपतीची अनेक मंदिरं आहेत. त्यापैकीच एक म्हणजे भोपाळचं चिंतामणी मंदिर. भोपाळपासून दोन किलोमीटरवर असलेल्या सीहोरमध्ये हे मंदिर आहे. राजा विक्रमादित्याने या मंदिराची स्थापना केली होती, असं म्हणतात. तसंच या मंदिरात स्थापन करण्यात आलेली मूर्ती त्याला साक्षात गणेशानेच दिली होती, असं मानलं जातं. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, राजा विक्रमादित्याला गणपतीने स्वप्नात दर्शन दिलं. पार्वती नदीच्या किनारी आपली मूर्ती पुष्परूपात असल्याचं सांगून तिची स्थापना करण्याचा आदेश दिला. राजा विक्रमादित्य नदीच्या किनारी गेला. तिथे त्याला एक फूल दिसलं. हे फूल घेऊन तो निघाला. रात्र झाल्यानंतर त्या फुलाचं रूपांतर गणपतीच्या मूर्तीत झालं आणि ही मूर्ती जमिनीत गाडली गेली. राजाच्या सैनिकांनी ही मूर्ती बाहेर काढण्याचे अथक प्रयत्न केले. पण सगळं व्यर्थ ठरलं. अखेरीस राजाने त्याच स्थानी मंदिर बांधलं आणि गणपतीच्या मूर्तीची स्थापना केली. या मंदिरातल्या गणेशमूर्तीचे डोळे



चांदीचे आहेत पण १५० वर्षांपूर्वी या मूर्तीचे डोळे हिऱ्याचे होते. हे डोळे चोरीला गेले. त्यानंतर डोळे असलेल्या भागातून दुधाची धार वाहू लागली. त्यानंतर गणपतीने मंदिराच्या मुख्य पुजाऱ्याला दर्शन दिलं. चांदीचे डोळे बसवण्याबाबत सांगितलं. त्यानंतर हे चांदीचे डोळे बसवण्यात आले. या मंदिरात भक्तमंडळींची गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. इथे केलेल्या मनोकामना पूर्ण होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

तीर्थक्षेत्र

# जरांगेंना मविआचा पाठिंबा

## असंवैधानिक मागण्या मांडायला लावले जात आहे आमदार परिणय फुके, आशिष देशमुखांचे टीकास्त्र

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामागे मविआतील तिन्ही पक्षाचे नेते आहेत. त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून कुठेतरी सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधत आहेत. उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी जरांगे पाटलांच्या आंदोलनाला समर्थन दिले आहे.



माझा मविआला सवाल आहे की, मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यात यावे ही जरांगे यांची मागणी आहे तिला तुमचे समर्थन आहे का? असा सवाल परिणय फुके यांनी केला आहे.

परिणय फुके पुढे बोलताना म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या मागे शरद पवार, उद्धव ठाकरे हे आहेत.ते जरांगे पाटील यांना असंवैधानिक मागण्या करायला सांगत आहे असा आरोपही फुकेंनी केला आहे.

**जरांगेंची मागणी असंवैधानिक**

परिणय फुके म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत काही मराठा समाजाचे लोक जमा झाले आहेत. ते ओबीसीमध्ये आरक्षणाची मागणी करत आहे. त्यांची ही मागणी चुकीची आहे. नागपूरमध्ये ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांच्या नेतृत्वात साखळी उपोषण सुरू होणार आहे. मी त्या उपोषणाला भेट देणार असून त्यांना आश्वासन देणार आहे की मराठा समाजाला ओबीसी तून आरक्षण मिळणार नाही. कारण ते असंवैधानिक आहे.

**जरांगेंना संविधानाचा अभ्यास नाही**

फुके म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांनी मागच्या काही दिवसांपासून ओबीसी तून आरक्षण मागितले आहे यावरुन मला वाटते की त्यांना संविधानाचा अभ्यास नाही. संविधानामध्ये कोणत्याही जातीला कोणत्याही प्रवर्गामध्ये टाकता येणार नाही. ओबीसी समाजाने घाबरण्याची गरज नाही, असे होऊ शकणार नाही.

**..तर फडणवीसांकडे घेऊन जाणार**

परिणय फुके म्हणाले की, जरांगे पाटील यांनी मागच्यावेळी मोठे आंदोलन केले होते त्यावेळी देखील राज्य सरकार आणि ओबीसी समाजाची मध्यस्थी मी केली होती. तेव्हा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री, तर देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री होते त्यावेळी एकनाथ शिंदेंनी आम्हाला शब्द दिला होता की ओबीसी आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही, आणि तो शब्द कायम आहे. मी बोलून जर ओबीसी समाज शांत झाला नाही तर त्यांचे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घालून देत त्यांना फडणवीस यांच्या माध्यामातून आश्वस्त करण्याचा प्रयत्न करू.

## साडे ३०० जातींसाठी असलेला ओबीसी कोटा आधीच अपुरा

राज्यात मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच पेटलेला असतानाच भाजप आमदार आशिष देशमुख यांनी या वादग्रस्त विषयावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्यांनी सांगितले की, साडे ३०० जातीसाठी असलेला ओबीसी कोटा आधीच अपुरा असून, या कोट्यात मराठा समाजाचा समावेश झाल्यास दोन्ही समाजांचे मोठे नुकसान होईल. ओबीसी समाजासाठी राखीव असलेला हक्क कुणालाही हस्तांतरित करता येणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. मराठा समाजाला आरक्षण मिळायलाच हवे असेही त्यांनी म्हटले आहे.

मराठा समाजाला नक्कीच आरक्षण मिळावे. आमचा त्यांना काही विरोध नाही. पण ते ओबीसीच्या कोट्यातून मिळावे हा जो मनोज जरांगे यांचा बालहट्ट आहे. त्यासंदर्भात ओबीसी समाज जागरूक आहे, असे ते म्हणाले.

मराठा समाजाला कोणत्याही परिस्थितीमध्ये ओबीसी समाजामध्ये वाटा मिळणार नाही. या संदर्भामध्ये ओबीसी महासंघाने नागपूरमध्ये भूमिका घेतली आहे. त्यासाठी आमचा संपूर्ण पाठिंबा आहे. १० टक्के आरक्षणाचा फायदा मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये होताना दिसून येत आहे.

**..तर दोन्ही समाजाचे नुकसान**

आशिष देशमुख म्हणाले की, साडे ३०० विविध जातीचा असलेला ओबीसी समाज आणि त्यासाठी असलेला जो कोटा आहे तो ओबीसी समाजासाठीच अपुरा आहे. म्हणून यामध्ये ओबीसी समाजाचे वाटेकरी होऊ नये. मराठा समाज ओबीसीमध्ये आला तर दोन्ही समाजाचे त्यामध्ये नुकसान होणार आहे.

यात ना मराठा समाजाला न्याय मिळेल ना ओबीसी समाजाला न्याय मिळेल. ही वास्तविकता समजून घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजे. दोन्ही समाजामध्ये वाद निर्माण होईल अशी परिस्थिती नाही, ती निर्माण ही करु नये. सरकार कोणत्याही परिस्थितीत ओबीसीत वाटेकरी येऊ देणार नाही, असे आमदार आशिष देशमुख यांनी ठासून सांगितले.

### ओबीसी महासंघाचा मराठा आरक्षणाला विरोध, मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्यास नकार

# नागपुरात साखळी उपोषण सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन सुरू केले आहे. नोंदी मिळालेल्या ५४ लाख मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची त्यांची मागणी आहे. ते पाहता सरकार दबावात निर्णय घेण्याची भीती ओबीसी समाजात आहे. मात्र दबावात येऊन निर्णय घेतल्यास वा तसे दिसल्यास आम्हीही आंदोलनाची तीव्रता वाढवू, असा रोखठोक इशारा राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी दिला. सरकारने कुणबी आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्हीही मुंबईत धडकू, असा सज्जड इशाराही तायवाडे यांनी यावेळी दिला.



मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याची मनोज जरांगे पाटील यांची मागणी आहे. सरकारने दबावात निर्णय घेत असल्याचे दिसल्यास आम्हीही आंदोलन तीव्र करू, असा इशारा तायवाडे यांनी दिला. राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे येथील संविधान चौकात साखळी उपोषण सुरू करण्यात आले. त्यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. पहिल्या दिवशी गडचिरोलीचे खासदार नामदेव किरसान, शिक्षक आमदार सुधाकर आडबाले, माजी आमदार सुधाकर देशमुख व अशोक धवड यांनी उपोषण मंडपाला भेट देऊन समर्थन दिले.

सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न केल्यास आम्हीही मुंबईत धडकू असा सज्जड इशारा तायवाडे यांनी दिला. कोणत्याही परिस्थितीत मराठ्यांना ओबीसीतूत आरक्षण देण्यास विरोध असल्याचे सांगितले. सरकार आमच्या मागण्या मान्य करीत नाही तोपर्यंत साखळी उपोषण सुरूच राहिल. ओबीसी आरक्षणाला धक्का लावू देणार नाही, असे तायवाडे यांनी सांगितले.

मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये ही ओबीसी समाजाची आग्रहाची मागणी आहे. ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही असे आश्वासन सरकारने दिले होते. त्यावर सरकारने कायम रहावे हीच आमची मागणी आहे. सरकार काय भूमिका घेते हे पाहून बेमुदत व पुढे अन्नत्याग आंदोलन करू. पण कोणत्याही परिस्थितीत संवैधानिक आरक्षणाला धक्का लागू देणार नाही असे तायवाडे यांनी सांगितले.

### स्थानिक स्वराज्य कौन्सिलच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी

## कैलास गोरे पाटील यांची निवड

■ **महासागर प्रतिनिधी वर्धा, दि. ३० :** भारताच्या लोकशाहीला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय स्थानिक स्वराज्य परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी कैलास गोरे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



राष्ट्रीय स्थानिक स्वराज परिषद ही एक स्वायत्त संस्था असून, सर्व घटकांचे ५० टक्के निवडून आलेले प्रतिनिधी, ४० टक्के संस्थापक सदस्य आणि १० टक्के नामनिर्देशित सदस्य असतील. स्वतंत्र राष्ट्रीय कोअर कमिटी, राष्ट्रीय कार्यकारी समिती, प्रादेशिक समिती (भारतातील सर्व राज्ये पाच क्षेत्रांमध्ये समाविष्ट केली जातील), क्षेत्र समिती आणि झोन कमिटी (प्रत्येक प्रदेशातील पाच झोन) यांची स्थापना येत्या काळात सुरू केली जाईल. राष्ट्रीय स्वयंसेवक स्वराज परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष भारत गाजीपारा (गुजरात) असून, राष्ट्रीय प्रमुख श्रीमती नयना बेन पटेल यांनी गुजरात राज्य पंचायत परिषदेच्या अध्यक्षा म्हणून विशेष काम केले आहे, राष्ट्रीय कार्यप्रमुख कैलाश गोरे पाटील महाराष्ट्रात राष्ट्रीय पातळीवर जिल्हा पंचायत सदस्य संघटनेचे अध्यक्ष म्हणून काम करत आहेत. मुकेश सखिया हे राष्ट्रीय मानद मंत्री आहेत

ही संस्था पंतप्रधान नरेंद मोदी, केंद्रीय मंत्री अमित शाह, मनोहरलाल खट्टर, तोखन साहू, रंजन सिंह, राज्यमंत्री एस.पी. यांनी स्थापन केली आहे.

स्थानिक संस्थांना बळकटी देणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असेल. भारतातील सर्व १,१५,००० हून अधिक तालुका पंचायत सदस्यांना सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय परिषदेद्वारे कार्य केले जाणार आहे.

## जरांगे परत का आले? शिंदेंना विचारा..

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केलं आहे. या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सूचक टोला लगावला आहे.

### राज ठाकरेंकडून शिंदेंची कोंडी



ठाण्यातील दौऱ्यात पत्रकारांनी मराठा आरक्षणावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले, मनोज जरांगे परत का आले, हे एकनाथ शिंदेंनाच विचारा. मागच्या वेळी जेव्हा ते नवी मुंबईत गेले होते, तेव्हा प्रश्न त्यांनीच सोडवल्याचे सांगितले होतं. मग आता पुन्हा आंदोलन का उभं राहिलं? असं म्हणत त्यांनी शिंदेंनाच अप्रत्यक्षपणे जबाबदार धरलं.

दरम्यान, मनोज जरांगेंच्या आंदोलनामुळे राज्य सरकारवर वाढत असलेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यात सह्याद्री अतिथीगृहावर सुमारे एक तासभर चर्चा झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कौतुक केले होते. सत्तेपेक्षा गोरगरिब जनतेच्या दुःखाला महत्त्व देणारा माणूस म्हणजे एकनाथ शिंदे, अशा शब्दात त्यांनी गौरव केला होता.

## लक्ष्मण हाकेंचा पुन्हा जरांगेंवर निशाणा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :** ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी शनिवारी पुन्हा एकदा मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास कडाडून विरोध केला आहे. या प्रकरणी त्यांनी मनोज जरांगे यांच्यासह महायुती सरकारवर सडकून हल्ला चढवला आहे.



राज्य सरकारला झुंडीची भाषा कळत असेल, शिवराळ भाषा कळत असेल, एक माणूस ज्याला महाराष्ट्र माहिती नाही, आरक्षण माहिती नाही, तो मुंबईला वेठीस धरत असेल, तर ओबीसी समाजही रस्त्यावर उतरेल, असे ते म्हणालेत.

लक्ष्मण हाके याविषयी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, राज्य सरकारला झुंडीची भाषा कळत असेल, शिवराळ भाषा कळत असेल, एक माणूस ज्याला महाराष्ट्र माहिती नाही, आरक्षण माहिती नाही, तो मुंबईला वेठीस धरत असेल तर ओबीसी समाजही रस्त्यावर उतरेल. आम्ही लवकरच आमच्या आंदोलनाची दिशा स्पष्ट करू. ओबीसींना रस्त्यावर उतरवू. अनेकदा भटक्या विमुक्तांना जातप्रमाणपत्र मिळण्यासाठी 6 महिने लागतात. पण इथे सरकारच जातप्रमाणपत्र वाटत आहे. जरांगे यांच्या एका आंदोलनानंतर सरकार बेजबाबदारपणे शासन निर्णय जाहीर करत असेल तर कुणालाही संताप येईल.

सरकारला अशा पद्धतीने जातप्रमाणपत्र वाटण्याचा अधिकार नाही, अशा शब्दात हाके यांनी आपला संताप व्यक्त केला.



### गणेश उत्सव मंडळांचे मनोगत

गणेशाच्या आगमनाने
आनंदाला येई उधान
नाचतो गातो भक्तिने
होऊनी सारे बेभान..

शाळेमध्ये मिळती
पुस्तकी ज्ञानाचे धडे
उत्सवातून व्यावहारीक
ज्ञानात भर पडे ..!

संघठने विना कार्य
जात नसते तडीला
सहकार व एकतेचे
महत्व पटते मनाला ..!

नियोजन व निवडीचे
महत्व कळाया लागते
कल्पकतेलाही त्यामुळे
भाऊ चालना मिळते..!

बजेटचं महत्व तर
अनुभवानेच कळले
म्हणून तर वर्गणीचे
नव नवे फंडे शोधले ..!

व्यवस्थापन तत्वे
उत्सवातुन शिकतो
'इव्हेंट ' चे स्कील -
आम्ही आत्मसात करतो ..!

यशश्वी जीवनाची
येथे होई पायाभरणी
गणराया भरारी घेण्या
शक्ती युक्ति दे जीवनी ..!

■ सौ.मंगलाताई अ. सारडा
शिवाजीनगर, मेहकर
(9421394339 )

## मलकापुरात शेतकऱ्यांचा मोर्चा

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. ३० :** शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आणि विविध मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली आज, शनिवारी, ३० ऑगस्ट रोजी मलकापूर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले होते. थकित पीक विमा १००टक्के मिळावा, शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळावी, विवरा गावातील सोलर कंपनीने अतिक्रमण केलेला रस्ता मोकळा व्हावा, ज्वारीची खरेदी सुरू व्हावी, तसेच कापूस आणि सोयाबीनच्या आयात-निर्यात धोरणात बदल व्हावा, शेतमजुरांना विमा सुरक्षा मिळावी, जंगली जनावरांचा त्रास रोखावा या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात आला.



## सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचा साज

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या मांदियाळीत श्री बालगणेश उत्सव मंडळ किनखेडे लेआउट बिनाकी मंगळवारी आपले २१ वे वर्ष मोठ्या थाटामाटात साजरे करीत आहे. यंदा एका हातात चक्र व एका हातात शंख धारण करणारी आकर्षक अशी सात फूट उंचीची लक्षवेधी गणेश मूतीर्ची स्थापना करण्यात आली आहे.

**श्री बालगणेश उत्सव मंडळ**
**किनखेडे लेआउट बिनाकी मंगळवारी**

२००४ साली दहा ते पंधरा वर्षाखालील बालमंडळाने, सामाजिक उपक्रमात हिरहिरीने सहभाग घेणारे संजय चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश मंडळाची स्थापना केली. सदैव समाज हितपयोगी कामे करणारे संजय चावरे यांनी नागरिकांच्या मनात आपले स्थान निर्माण करीत माजी नगरसेवक, माजी सभापती अशी पदे भूषवित ते आज भाजप झोपडपट्टी आघाडीचे महामंत्री आहेत.

त्यांच्याच पुढाकारातून व मार्गदर्शनाखाली २९ ऑगस्टला रक्तदान शिबिर घेण्यात आले. तसेच बॉडी चेकअप कॅम्प घेण्यात आला.

या सोबतच बालगोपाल व मोठ्यांसाठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, रांगोळी स्पर्धा, आनंद मेळावा, नाटक स्पर्धा समोर दहा दिवसात घेण्यात येणार आहे. ५ सप्टेंबरला भव्य महाप्रसादाचे आयोजन असून ७ सप्टेंबरला विसर्जन होणार आहे. आतापर्यंत यशोधरा पोलीस स्टेशनचे पी. आय. रमेश खुने, ए.सी.पी. बंडेवार यांनी गणेश मंडळाला भेट दिली आहे.

गणेश मंडळाचे अध्यक्ष राहुल तेलखेडे, संजय चावरे, दीपसिंग दिगवा, स्वप्निल येरपुडे, अतुल ठाकरे, हरीश बावने, अजय चौरसिया, राजू चौरसिया यांचे गणेश मंडळाच्या उपक्रमात सहकार्य लाभत आहे.

## सदरचे ठाणेदार मनिष ठाकरे यांना भावपूर्ण निरोप



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :** सदर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिष ठाकरे यांना अमरावती ग्रामीण एसीपी पदावर बढती देण्यात आली आहे. त्यांच्या पदोन्नतीबद्दल निवृत्त एसीपी अहमद, एक हात माणुसकीचा उपक्रमाचे संस्थापक अध्यक्ष संदीप भूषणवार, ग्राहक जन जागृतीचे अध्यक्ष कमल नामपल्लीवार, सामाजिक कार्यकर्ते अशोक भाऊ कडव, गज्जू ठाकूर, सरदार रेणू यांनी ठाकरे यांच्या निवासस्थानी भेट घेत त्यांचे अभिनंदन केले आणि निरोप दिला.



सदर पोलीस स्टेशनमध्ये झालेल्या सत्कार आणि निरोप समारंभात या ठाण्याचे नवीन ठाणेदार म्हणून अमोल देशमुख यांनी पदभार स्वीकारला. मनिष ठाकरे यांनी त्यांच्या कार्यकाळात सदर पोलीस स्टेशन अंतर्गत भरीव कार्य केले. गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्याबरोबरच त्यांनी सामान्य जनतेशी नाळ जोडून अनेक अभिनव उपक्रम राबविले.